# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १० मार्च, २०१५ / फाल्गुन १९, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९६**

---

**मौजे देसवडी पिंपळगाव (ता.दौंड जि.पूणे) येथील मंदिर परिसरात तीन वर्षाखालील २ मुलांचे मृतदेह गुलाल टाकलेल्या अवस्थेत सापडल्याबाबत**

**(१) * ९२१६ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देसवडी पिंपळगाव (ता.दौंड, जि.पूणे) येथील शासकीय वन खात्याच्या जागेतील मंदिर परिसरात तीन वर्षाखालील २ मुलांचे मृतदेह गुलाल टाकलेल्या अवस्थेत सापडल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मुलांचा नरबळी देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मौजे पिंपळगांव, ता. दौंड, जि.पुणे येथील शासकीय वन खात्याचे तळ्याचे जागेत २ लहान बालकांचे मृतदेह मिळून आलेले असून ते मंदीर परिसरात मिळून आलेले नाहीत. तसेच ते गुलाल टाकलेल्या अवस्थेत सापडलेले नाहीत.

(२) व (३) सदर प्रकरणी यवत पोलीस स्टेशन येथे अकस्मात मयत रजि.नं. १६१ / १४ सीआरपीसी १७४ प्रमाणे दिनांक १८.०२.२०१४ रोजी दाखल करण्यात आले आहे. मरण हे आजारामुळे झाले असल्याचे सदर मयताचे प्राथमिक तपासावरुन निष्पन्न झालेले आहे. सदर मयताचे पोस्ट मार्टम रिपोर्ट प्राप्त करुन घेणेकरिता वैद्यकीय अधिका-याकडे पाठवलेले असून वैद्यकीय अधिकारी यांनी मयत बॉडया डिकम्पोज झाल्याने मयताचे मृत्युबाबत कारण राखीव ठेवलेले आहे.

सदर अकस्मात मयताचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुहागर (जि.रत्नागिरी) येथील जेटीच्या निकृष्ट कामाबाबत**

**(२) * ९३८० श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) येथील समुद्रकिना-यावर ८० लाख रुपये खर्च करुन बांधलेली जेटी वर्षभराच्या आत कोसळल्याने ती तीन महिन्यांपासून बंद असल्याची बाब माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जेटीच्या निकृष्ट कामांसदर्भात दोषी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

**गिट्टी खदान (नागपूर) पोलीस ठाण्यातील तीन अधिकारी व कर्मचा-यांनी ४० लक्ष रुपयांची बनावट देयके सादर केल्याबाबत**

**(३) * ११२३६ श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर गिट्टी खदान पोलीस ठाण्यातील तीन अधिकारी व कर्मचा-यावर ४० लाखांच्या स्पेअर पार्टसची बनावट देयके सादर केल्याप्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर, २०१४ रोजी गुन्हा दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील स्पेअर पार्ट डिलर्स व दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी पोलीस मोटार वाहन विभागातील २ अधिका-यांना व २ कर्मचा-यांनी रु.४०,२४,४६७ चे बनावट खोटे दस्ताऐवज तयार करुन शासनाची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांच्या विरुध्द पो.स्टे.गिट्टी खदाण येथे अप क्र. ३९३/१४ भा.दं.वि. कलम ४०९, ४६७,४२०,४६८, ४७१,४७७ (अं) आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर शहरात रस्ते बांधताना आयआरबी कंपनीने युटिलिटि शिफ्टिंगकडे दुर्लक्ष केल्याबाबत**

**(४) * ७०९३ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात रस्ते बांधताना आयआरबी कंपनीने युटिलिटी शिफ्टिंगला बगल देऊन रस्त्यांच्या खाली जलवाहिन्या व ड्रेनेजलाईन गाडल्यामुळे तसेच त्या लाईन २५ ते ३० वर्षापूर्वीच्या असल्याने पाईपलाईन रोज कुठे ना कुठे गळती होत असल्याने महापालिका प्रशासनाच्या वतीने केलेल्या रस्ते खोदाईपोटी तब्बल अडीच कोटी रुपये आयआरबी कंपनीकडे भरण्यासंदर्भातील देयक माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास महापालिकेला पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयआरबी कंपन्यांच्यावतीने शहरात २२० कोटींचा रस्ते प्रकल्प राबविण्यात आला असून चार वर्षे उलटली तरीही प्रकल्प अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

शासन निर्णय, नगरविकास विभाग दि. 24 जानेवारी, 2008 मधील परिच्छेद क्र. 5 नुसार सेवावाहिन्या हलविण्याची जबाबदारी उदयोजकाची आहे. तसेच सवलतीच्या करारनाम्यातील तरतूदीनुसार सेवावाहिन्या हलविण्याची जबाबदारी उदयोजकाची असल्याने उदयोजकाने रस्ते खुदाईपोटी मागणी केलेली रक्कम रु. 2.83 कोटी महानगरपालिका देय होत नसल्याचे महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशतः खरे आहे.

(४) उदयोजकाकडून खडडे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ५०५४ या लेखाशिर्षाखालील निधी 'ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील नागरी भागातील रस्त्यांकरिता वापरण्यास परवानगी देण्याबाबत.**

**(५) * १००८१ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ५०५४ या लेखाशिर्षाखालील निधी 'ड' वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील नागरी भागातील रस्त्यांकरिता वापरण्यास परवानगी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (अकोला प.) यांनी मा.अर्थ व नियोजन मंत्र्यांना दिनांक २८ जानेवारी, २०१५

रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्याचे वार्षिक नियोजन करताना जिल्ह्यातील क्षेत्रफळ व लोकसंख्येच्या आधारावर निधी वाटपाचे नियोजन करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**सिंहगड रस्त्यावर (जि.पुणे) वारंवार होणा-या लुटमारीच्या घटना रोखण्याबाबत**

**(६) * ५२७० श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंहगड (जि.पुणे) रस्त्यावरुन जाणा-या तिघा जणांकडील सोन्याचे दागिने, किंमती वस्तू व रक्कम लुटण्याच्या वेगवेगळ्या घटना दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास घडल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सिंहगड रस्त्यावर वारंवार होणा-या लुटमारीच्या घटना रोखण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, सदर घटनासंदर्भात दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे गुरक्र. १२ /१५ भादंवि कलम ३९२ प्रमाणे दि. १८-०१-२०१५ रोजी गुन्हा दाखल असून सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.
(३) अशा प्रकारच्या घटना घडू नये म्हणून सिंहगड रोडवर नाकाबंदी, पेट्रोलिंग करण्यात येत आहे. तसेच गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याकरीता स्वतंत्र सिंहगड पोलीस ठाणेची निर्मिती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) परिसरातील राहनाळ गावातील मढवी कंपाऊंड मध्ये भंगार गोदामात लागलेल्या भीषण आगीत आठ कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(७) * ७३५७ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड यशोमती ठाकूर (तीवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंब्रादेवी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) परिसरातील राहनाळ गावातील मढवी कंपाऊंडमध्ये भरलेल्या पत्र्याच्या गोदामात दिनांक २७ डिसेंबर,२०१४ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या भीषण आगीमध्ये ८ कामगार होरपळून मृत्यूमुखी पडले असून अनेक कामगार गंभीररित्या जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुर्णा,राहनाळ,मानकोळी,कोपर,काल्हेर,गुंदवली,तळ,कशेळी या परिसरात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर ज्वलनशील रासायनिक साठ्याची गोदामे असल्याने ही घटना घडली असून या गोदामांकडे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर गोदामांवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली,

(४) तसेच कामगारांच्या सुरक्षिततेसाठी व मृत कामगारांच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक मदत करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) भिवंडी (जि.ठाणे) परिसरातील राहनाळ गावातील मढवी कंपाऊंडमध्ये लाकडी पट्ट्या, लाकडाचा भूसा व प्लास्टिक भंगार इत्यादी सामानाच्या गोदामास दि. २७.१२.२०१४ रोजी लागलेल्या आगीमध्ये ८ जण मृत्यू पावले असून ३ जण जखमी झाले आहेत.

(२) या प्रकरणी सचिव (विशेष), गृह विभाग यांनी दि. २६.८.२०१४ रोजी संबंधितांची बैठक घेतली होती. बैठकीमध्ये भिवंडी तालुक्यातील गोदामांची यादी तयार करुन सह पोलीस आयुक्त ठाणे यांनी त्याची अचानाक तपासणी करावी, असे निर्देश दिले आहेत. तसेच सदर यादी जिल्हा परिषद कार्यालयाने जिल्हाधिकारी, ठाणे आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास पुरविण्याबाबतही कळविले आहे.

(३) या घटनेची केलेल्या पोलीस चौकशीमध्ये, सदर जागा मालकाने गोदामाकरीता बेकायदेशीररित्या भाड्याने दिल्याचे आढळून आले आहे. तेथे व्यवसाय करणा-या भाडेकरुने बेकायदेशीर व्यवसाय केला आहे. त्यामुळे नारपोली पोलीस ठाणे येथे जागा मालक व

व्यावसायिक यांच्याविरुध्द गु.र.क्र. ५३९ /२०१४ भा.दं.वि.सं. कलम ३०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून, गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.
(४) या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या ७ नेपाळी व्यक्ती व जखमी पात्रता निकषामध्ये न बसल्यामुळे आर्थिक मदत देण्यात आलेली नाही. तथापि, एक व्यक्ती उत्तर प्रदेशचा रहिवाशी असल्याने त्यांचे कायदेशीर वारस निश्चित करण्याबाबत उत्तर प्रदेश शासनाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. वारस निश्चित झाल्यानंतर निकषानुसार वारसास मदत देण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नवेदर नवगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) व इतर गांवात**
**सागरी धुपप्रतिबंधक बंधारा बांधणेबाबत**

**(८) * ७६६४ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवेदर नवगाव, माडवा, टाकादेवी,नागाव, आंबेली, पाल्हे, हटाळे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील खाडी लगत मोठ्या प्रमाणात बागायती व भात शेती असून समुद्राच्या मोठ्या उधाणामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते याबाबत अलिबाग तालुक्यातील स्थानिक लोकप्रतिनिधीनी सागरी धुप प्रतिबंधक बंधारा बांधणेबाबत दिनांक १ जुलै, २०१३ रोजी निवेदनाअन्वये महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी सागरी धुपप्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) नागाव येथे धूपप्रतिबंधक बंधा-याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

नवेदर नवगाव व मांडवा येथील धूपप्रतिबंधक बंधा-यांच्या कामांचे सर्वेक्षण करण्यात आले असून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात राज्यस्तरीय योजनेअंतर्गत करावयाच्या कामांमध्ये या कामांचा समावेश करण्यात आला आहे.

टाकादेवी, आंबेली, पाल्हे, हटाळे येथे प्रत्यक्ष ठिकाणी सर्वेक्षण करुन आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेण्यात येतील.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सिडको हद्दीत ठिकठिकाणी फुटलेल्या जलवाहिन्यातून पाणी वाया जात असल्याबाबत**

**(९) * ८१५१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहीत (कुलाबा), श्री.बापुराव कथोरे (शिरुर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.समिर कुनावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सिडको हद्दीत ठिकठिकाणी फुटलेल्या जलवाहिन्यातून पाणी वाया जात असल्याची तक्रार नागरिकांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास संबंधित विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फुटलेल्या जलवाहिन्यातून पाणी दिवस रात्र वाया जात असून नियमित पाणी पट्टी भरत असलेल्या कामोठेवासियांना मात्र पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फुटलेल्या जलवाहिनी दुरुस्त करण्याबाबत व कामोठा परिसरातील नागरिकांना नियमित पाणी पुरवठा करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणाची कुठली ही तक्रार प्राप्त झाली नाही. परंतु काही फुटलेल्या जलवाहिन्या जुई-कामोठे ग्रामपंचायतीच्या आहेत, ज्या कामोठे या सिडको विभागातून जातात.

(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर इ. शहरातील सुमारे २००० मेट्रीक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत**

**(१०) * ७००३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अमिन पटेल (मुंब्रादेवी), श्री.विजय वड्डेटीवार (चिमूर), ॲड यशोमती ठाकूर (तीवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमतीनिर्मला गावीत (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनूरी), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मलाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर इ. शहरातील सुमारे २००० मेट्रीक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा येथील एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प रद्द केल्याच्या निषेधार्थ लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व

एमएमआरडीए प्रशासनाकडे दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील कचऱ्याची समस्या रौद्र स्वरुप धारण करत असून नागरीकांच्या आरोग्यावर होत असलेल्या घातक परिणामांचा विचार करता, शासनाने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नगराध्यक्ष, अंबरनाथ नगरपरिषद यांनी दिनांक ०६.०१.२०१५ च्या पत्रान्वये दिनांक २०.०१.२०१५ रोजी पासून अंबरनाथ शहरातील नागरीकांच्या आरोग्याच्या प्रश्नाकरिता, स्वतः व समस्त नगरसेवक, पक्ष कार्यकर्त्यांसह मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयासमोर "लाक्षणिक उपोषणास" बसणार असल्याचे कळविले होते.
(२) व (३) तळोजा येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाबाबत दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी प्रधान सचिव नगरविकास-२ यांचे अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी, मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिकांनी व नगरपरिषदांनी तळोजा येथील सामाईक भरावभूमी प्रकल्पामध्ये सहभागी होण्यास तयार असल्याबाबत व त्यासाठी आवश्यक असलेली "टिपिंग फी" भरण्याची तयारी असल्याबाबतचा महासभेचा ठराव घेवून सहमती कळविण्यात यावी असे ठरले. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या प्रकल्पाची पुर्नरचना करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करावा असा निर्णय घेण्यात आला.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील व्यावसायीक इमारतींना ग्लास फसाड लावण्यामुळे अग्निशमन दलास मदत कार्यात उद्भवणा-या समस्या

**(११) * ८४०३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सन २०१२ पूर्वी उभ्या राहिलेल्या काचेच्या इमारतींसाठी महानगरपालिकेने नियमावली तयार केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अग्निशमन दलाच्या सूचनेनुसार या इमारतीत आवश्यक बदल करुन इमारती सुरक्षित करण्यासाठी इमारतींना १२० दिवसांची मुदत देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, व्यावसायिक इमारतींना ग्लास फसाड मोठ्या प्रमाणात लावले जात असल्यामुळे आग लागल्यास मदतकार्य धोकादायक ठरते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा उंच इमारतींना आग लागल्यास अग्निशमन दलाकडे पुरेशी साधन सामुग्री

उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईत २८.०८.२०१३ पूर्वी बांधलेल्या काचेच्या इमारतीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे अग्निसुरक्षा उपाययोजना तयार करण्यात येत आहेत.
(२) मुंबई अग्निशमन दलाने प्रस्तावितेल्या उपाययोजनांस प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यावर यापूर्वी अस्तित्वात आलेल्या काचेच्या इमारतींना आवश्यक ते बदल करण्याकरिता १२० दिवसाची मुदत देण्याचे विचाराधीन आहे.
(३) काचेच्या इमारतींकरिता करावयाच्या अग्निसुरक्षा उपाययोजना या दि. २८.०८.२०१३ पासुन अंमलात आल्या असून, त्यानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावित काचेच्या इमारतींना त्या लागु करण्यात आलेल्या आहेत. सदर उपाययोजनांची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत असून अशा ठिकाणी आग लागल्यास मदत कार्य तुलनात्मक दृष्टया सोपे होते.
(४) मुंबई अग्निशमन दलाकडे सध्या विविध उंचीचे हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म, टर्न टेबल लॅडर उपलब्ध असुन अधिक उंच शिडी असलेली गाडी परदेशातुन आयात करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेमध्ये कामगारांची बनावट नियुक्ती करुन झालेला लाखो रुपयांचा गैरव्यवहार**

**(१२) * ११९२२ श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेमध्ये कामगारांची बनावट नियुक्ती करुन लाखो रुपयांचा घोटाळा झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुरुवातीस निदर्शनास आले आहे व महानगरपालिकेमधील झालेल्या कामांची देयके अदा करताना गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या अखेरीस उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सांगली शहरामध्ये करण्यात आलेली रस्त्यांची कामे निकृष्ठ दर्जाची झाली असल्याने त्या कामांची गुण नियंत्रण तपासणी झाली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) या प्रकरणी प्रशासन अधिकारी, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांनी दिलेल्या फिर्यादिवरुन मिरज शहर पोलिस ठाणे येथे गुन्हा क्रमांक 210/2014 भा.द.वि. कलम 420,465,468,471,34 प्रमाणे दि. 20/12/2014 रोजी गुन्हा दाखल केला असून त्याचा तपास सुरु आहे.
(2) व (3) हे खरे नाही.
(4) व (5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जेएनपीटी बंदरातील नवीन जेटीमूळे बाधित होणा-या ग्रामस्थांच्या मागण्यांकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष**

**(१३) * ७१४८ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट शेवा येथील निर्माण होणा-या नविन जेटीमुळे बाधित होणा-या न्हावे ग्रामस्थांच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ न्हावा ग्रामस्थांनी जेएनपीटी प्रशासनाविरोधात दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास आंदोलन केले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ग्रामस्थांच्या मागण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) अद्याप यासंदर्भात निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट हे विश्वस्त मंडळ केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे.

-----------------

**"एसआरए" च्या जमिनींसाठी विकासकाने रेडीरेकनरच्या आकारणीप्रमाणे २५ टक्के शुल्क देण्याबाबत**

**(१४) * ८११९ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) "एसआरए" च्या जमिनींसाठी विकासकाने रेडीरेकनरच्या आकारणीप्रमाणे २५ टक्के शुल्क देणे आवश्यक असल्याच्या शासन आदेशाचा चुकीचा अर्थ लावल्याने "एसआरए" प्राधिकरणाला कोट्यवधी रुपयांचा फटका बसल्याचे कॅगच्या अहवालात स्पष्ट झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एसआरए प्रकल्पांत गैरव्यवहार, महसुली तोटा, दंडवसुलीचा अभाव या बाबींचा

घोटाळ्यात समावेश असल्याचे उघडकीस आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घोटाळ्याची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, दोषींविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) निवासी लेखा परिक्षा अधिका-यांनी झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सन २०१२-१३ मध्ये केलेल्या निरीक्षणात शासन निर्णय गृहनिर्माण दिनांक २६.५.२००९ च्या तरतूदीनुसार विकासकाकडून वसूल करण्यात येणा-या अधिमूल्याची रकमेची चुकीच्या पध्दतीने गणना केल्यामुळे तोटा झाल्याचा आक्षेप नोंदविला होता. सदर आक्षेपास अनुसरुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ७.२.२०१४, दिनांक ११.२.२०१४ व दिनांक २३.२.२०१५ अन्वये विकासकाकडून वसूल करण्यात येणारी अधिमूल्याची रक्कम शासन अधिसूचना, नगर विकास विभाग, दिनांक १६.४.२००८ व दिनांक २८.६.२०१२, तसेच शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दिनांक २.७.२०१० अन्वये करण्यात आलेली असून ती योग्य आहे अशा आशयाचा पूर्तता अहवाल लेखा अधिका-यांना पाठवून तो आक्षेप बंद करण्याबाबत कळविलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरामध्ये सायबर गुन्हयाच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत**

**(१५) * ५८९० प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये सायबर गुन्हयाच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) बृहन्मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यामध्ये सायबर गुन्हयाची नोंद माहिती व तंत्रज्ञान कायद्यान्वये करण्यात येते. त्याचप्रमाणे विशेष व गंभीर सायबर गुन्ह्यांची नोंद सायबर पोलीस ठाण्यामध्ये केली जाते. सदर गुन्ह्यातील आरोपीता विरुध्द जास्तीत जास्त तांत्रिक

पुरावा गोळा केला जातो. त्याकरिता परदेशात असणा-या सर्व्हर, वेबसाईट, नेटवर्किंग साईटचे अडमिनिस्ट्रेटर्स तसेच आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार असलेल्या देशाशी संपर्क साधून माहिती मिळविण्यात येते. आरोपीतांचा कसुन शोध घेवुन त्यांना माहिती व तंत्रज्ञान कायदा, भारतीय दंड विधान कायद्यान्वये जास्तीत जास्त शिक्षा मिळावी त्यायोगे तपास पुर्ण करुन न्यायालयात सदर आरोपीता विरुध्द दोषारोप पत्र सादर केले जाते.

मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यांतील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले असून सदर प्रशिक्षणांतर्गत सायबर गुन्हे अन्वेषण तसेच बॅंकिंग क्षेत्रात होणारे गुन्हे या संदर्भात माहिती तसेच सदर गुन्ह्यांना प्रतिबंध व प्रकटीकरण करण्याकरिता तसेच सायबर गुन्हे हाताळण्यासाठी विशेष तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षण घेतलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच मुंबई यांचे मार्फतीने सायबर गुन्हे प्रतिबंधाकरीता सर्व सामान्य लोक तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, न्यायालयीन संस्था व सरकारी कार्यालये यांना सायबर गुन्ह्यांबाबत माहिती देवून जागरुकता निर्माण केली जात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे मंदगतीने सुरु असल्याबाबत**

**(१६) * ६०२९ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राणा जगजितसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (सहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड यशोमती ठाकूर (तीवसा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा काही महिन्यांवर आला असतांना सर्वच कामे मंदगतीने सुरु असल्याचे माहे जानेवारी २०१५ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर कामे तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ अंतर्गत नाशिक - त्र्यंबकेश्वर येथे होणा-या सर्व प्रकारच्या कामांची पाहणी व आढावा मा.मंत्री, जलसंपदा तथा पालकमंत्री, नाशिक जिल्हा यांचे स्तरावरुन तसेच प्रधान सचिव (नवि-२), विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी तसेच कार्यान्वयीन यंत्रणांचे पर्यवेक्षीय अधिकारी यांचे स्तरावरुन वेळोवेळी घेण्यात आलेला आहे.

(३) सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन व अंमलबजावणी संदर्भात दिनांक २८/१२/२०१२ च्या शासन निर्णयान्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती, मा.मुख्य सचिव

यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती, मा.पालकमंत्री, नाशिक जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती, व जिल्हाधिकारी नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची नेमणूक करण्यात आलेली आहे.

याशिवाय मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने वेळोवेळी घेतलेल्या व घेतल्या जाणा-या निर्णयाची कालबध्द व यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याच्या हेतूने अपर मुख्य सचिव (सा.बां.वि.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९/२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये केंद्रीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीने मान्यता दिलेल्या आराखड्यातील कामे पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले असून, त्यानुसार कायमस्वरुपी कामे मार्च, २०१५ अखेर पूर्ण होणे अपेक्षीत असून, तात्पुरत्या स्वरुपातील कामे कामाच्या स्वरुपानुसार जुन २०१५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील बी.आर.टी मार्गाच्या प्रकल्पात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१७) * ८२४२ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वारगेट ते कात्रज व स्वारगेट ते हडपसर या पुण्यातील प्रायोगिक तत्वावरील बी.आर.टी मार्गाच्या प्रकल्पात गैरव्यवहार झाल्याचा ठपका शासनाच्या उच्चस्तरीय समितीने वर्तविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यातील बी.आर.टी. प्रकल्पातील आजवर झालेला खर्च आणि त्या प्रमाणात झालेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबतचे आक्षेप अहवालात नोंदविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील पथदर्शी बी.आर.टी.प्रकल्पाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची सूचना समितीच्या अहवालात करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) स्वारगेट ते कात्रज व स्वारगेट ते हडपसर या पुण्यातील प्रायोगिक तत्वावरील बी.आर.टी. मार्गाच्या प्रकल्पात गैरव्यवहार झाल्याप्रकरणी राज्य शासनाने कोणतीही उच्चस्तरीय समिती नेमली नसल्याने गैरव्यवहार झाल्याचा ठपका ठेवण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारती तसेच म्हाडाच्या ५६ वसाहतीच्या पूनर्विकासाबाबत**

**(१८) * ६५४७ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.तुकाराम काते (अनुशक्तिनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारती तसेच म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (५), ३३ (७) नुसार किमान ३०० चौ.फुटाचे घर (आतील क्षेत्रफळ) व ३३ (९), ३३ (१०) अन्वये किमान ५०० चौ.फुटांचे घर (आतील क्षेत्रफळ) देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पुनर्विकास कामांना परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीचा पुनर्विकास मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३ (७) व ३३(९) नुसार तर म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३ (५) नुसार करण्यात येत असून सदर दोन्ही विनियमांतर्गत लाभार्थ्यांस किमान ३०० चौरस फुटाचे घर देण्यात येते. मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३(९) अंतर्गत भुखंडाच्या क्षेत्रफळानुसार १५ ते ३० टक्के पर्यंत अधिकचे क्षेत्रफळ अनुज्ञेय करण्यात आले आहे.
(२) मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीचा पुनर्विकासाकरीता विकासकांकडून मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३ (७) नुसार प्रस्ताव प्राप्त झाल्यावर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत प्रस्तावाची छाननी करुन त्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच म्हाडा अभिन्यासांमधील इच्छुक संस्थांनी पुनर्विकासाकरीता अर्ज केल्यावर त्यावर मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत तातडीने कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इचलकरंजी (जि. कोल्हापूर) पालिकेच्या “लेक वाचवा अभियान”**
**योजनेच्या मंजूरीसाठी उपविधीतील त्रुटी दूर करण्याबाबत**

**(१९) * ९३१४ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) “लेक वाचवा अभियान” इचलकरंजी (जि. कोल्हापूर) पालिकेने चार वर्षापूर्वी नवजात मुलींच्या नावे १० हजार रुपये ठेव ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या मंजूरीसाठी आवश्यक असणाऱ्या उपविधीतील त्रुटी दूर करण्याबाबत प्रशासनाकडून अनास्था दाखविण्यात आली असल्याने या योजनेचा बोजवारा उडालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या चार वर्षापासून ३०० अर्ज मंजूरीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

(३) होय.

(४) व (५) महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३२२ अन्वये ''लेक वाचवा अभियान'' या उपविधीबाबत निर्णय घेण्याबाबतची बाब जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अखत्यारितील असल्याचे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कळविले आहे.

-----------------

**भांडुप (मुंबई) येथील डोंगराळ विभागातील झोपडपट्टीकरिता**
**नियोजनबध्द मास्टर प्लॅन तयार करण्याबाबत**

**(२०) * ६५२५ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.तुकाराम काते (अनुशक्ति नगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (मुंबई) येथील डोंगराळ विभागातील झोपडपट्टीकरिता नियोजनबध्द मास्टर प्लॅन तयार करून चटई निर्देशांक (एफएसआय) वाढवून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, समाजसेवक व रहिवाशी यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१४ रोजी मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच धारावी मुंबई येथील झोपडपट्टी प्रमाणेच भांडुप येथील डोंगराळ भागात कठीण क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, धारावी येथील झोपडपट्टीचे निकष भांडुप विभागासाठी लावून पुनर्विकासाची योजना जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) भांडूप, मुंबई येथील डोंगराळ भाग कठिण क्षेत्र म्हणून घोषित करण्यासंदर्भात भाडेकरु कृती समिती यांचे दिनांक ९.२.२००८ व तत्कालीन लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ६.१२.२०११ तसेच सध्याच्या लोकप्रतिनिधींचे दिनांक ६.२.२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले आहे.
(२), (३) व (४) भांडूप येथील डोंगराळ भाग हा सद्यःस्थितीत कठिण क्षेत्र म्हणून घोषित केलेला नाही. बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या तरतूदीनुसार त्यातील अटीची पूर्तता होत असल्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कठिण क्षेत्र घोषितच करण्याचा विचार करता येतो. मा.सदस्यांना अपेक्षित असलेल्या भांडुप येथील ''कठिण क्षेत्र '' असलेल्या भागाचा निर्देश केल्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल.

-----------------

**राज्यात पोलिस विभागात ६७७० विविध पदे रिक्त असल्याबाबत**

**(२१) * ६६४० डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.बच्चू कडू (अचलपूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अप्पर पोलीस महासंचालक ते सहायक उपनिरीक्षक दर्जाच्या अधिका-यांची सुमारे ६७७० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दहशतवादाच्या हल्याबाबत वारंवार गुप्तचर यंत्रणेकडून मिळणारे संदेश, दिवसेंदिवस वाढीस लागलेले विविध गुन्ह्याचे प्रकार, महिला व शाळकरी मुलींवर होणारे बलात्कार व त्यामुळे हकायदा व सुव्यवस्थेची गंभीर समस्या निर्माण झालेली असल्याने पोलीस यंत्रणेवर कामाचा ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) उपरोक्त रिक्त पदे सरळसेवा व पदोन्नतीने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदूर्ग जिल्हयातील रेडी बंदर विकसातील अटी व शर्तीचे उल्लंघन करून अर्नेस्ट शिपिंग कंपनीने शासनाचे कोट्यवधी रूपयांचे नुकसान केल्याबाबत

**(२२) * ७९८४ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील रेडी बंदर विकसित करण्यासाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड आणि अर्नेस्ट शिपिंग कंपनी यांच्यात करार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर करारातील अटीनुसार तीन वर्षात बंदर बांधकाम पूर्ण करणे आवश्यक असतांना शिपिंग कंपनीकडून आजतागायत कोणतेही पालन झालेले नसून बंदर हद्ददेखील निश्चित झालेली नाही, निर्यात माल हाताळणीसाठी आवश्यक असणा-या बँक गॅरंटीची पूर्तता केलेली नाही, चढणावळ शुल्कापोटी शासनाने तीन रूपये प्रतिटन असा दर लागू केला असतांनाही कंपनीने ४५ रूपये प्रतिटन दर आकारणी केलेली आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची तसेच पर्यटन विभागाचीही परवानगी घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच करारानुसार सदर कंपनीने सुधारित आराखडा तयार करून त्याचा पूर्णत्वाचा दाखला घेणे आवश्यकता असतांनाही अटी व शर्तीचे उल्लंघन करून रेडी बंदराचा व्यावसायिक वापर सुरू केल्यामुळे शासनाचे कोट्यवधी रूपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने तातडीने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही)**

-----------------

## नेवाळीनाका (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) तसेच कल्याण येथील विकासकांनी नागरिकांची फसवणूक केल्याबाबत

**(२३) * ७२४९ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवाळीनाका (ता.अंबरनाथ जि.ठाणे) येथे आकृती बिल्डर्सने चाळ पध्दतीची अनधिकृत घरे बांधून सर्वसामान्य गरीब नागरिकांची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कल्याण (जि.ठाणे) येथील ओम साई सिटी बिल्डरकडून स्वस्त घरांचे आमिष दाखवून लाखो रूपयांची फसवणुक केल्याप्रकरणी ४३ जणांनी कल्याण बाजारपेठ पोलीस ठाण्यात दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कल्याण (जि.ठाणे) येथे भानुसागर टॉकीजजवळ कार्यालय असलेल्या श्री.साई एकविरा बिल्डर्सने स्वस्त घरांचे प्रलोभन दाखवून ११६ गरजू नागरिकांकडून १ कोटी ६० लाख रुपये घेऊन पलायन केल्याची तक्रार नागरिकांनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०१४ रोजी महात्मा फुले पोलीस ठाण्यात नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व तद्नुसार सदर बिल्डर्सवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) होय.

(५) नेवाळीनाका ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे आकृती बिल्डर्स विरुध्द महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ७७८/२०१४ भादंविसं कलम ४२०, ४०६, ४४७, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली असून ११ आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. प्रकरणी आरोपींकडून १४,५६,८९०/- रुपये हस्तगत करण्यात आले आहेत. प्रकरणी सदर कंपनीची बँक खाती मा. न्यायालयाचे आदेशान्वये सी.आर.पी.सी. कलम १०२ प्रमाणे गोठविण्यात आलेली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

कल्याण (जि.ठाणे), येथील ओमसाई सिटी बिल्डर्स विरुध्द बाजारपेठ पोलीस स्टेशन गुरनं. ३३/२०१५ भादंवि ४२०,४०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रकरणी आरोपी शोध घेण्यात येत असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

कल्याण (जि.ठाणे) येथील श्री.साई एकविरा बिल्डर्स विरुध्द महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ८६४ / २०१४ भादंविसं कलम ४२०, ४०६, ३४ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रकरणी आरोपींना अटक करण्यात येत असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीबाबत**

**(२४) * ६५९६ श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रताप चिखलीकर (लोहा), :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेले कोल्हापूरातील महालक्ष्मी मंदीर, जोतिबा देवालय यासह कोल्हापूर, सांगली आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांमधील ३०६७ देवस्थाने पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती अंतर्गत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देवस्थानच्या देवालयात भाविकांकडून येणारे दागदागीने किती आहेत, त्याचे मुल्य किती आहे व या देवस्थानाचे वार्षिक उत्पन्न किती आहे याबाबतचे हिशोब व त्याचे लेखा परिक्षण करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने देवस्थानाच्या व्यवस्थापनात आणि कारभारात प्रचंड गैरव्यवहार केला असल्याचे हिंदू विधिज्ञ परिषदेने नुकतेच पुराव्यासह उघडकीस आणले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) देवस्थान व्यवस्थापन समितीच्या नियंत्रणाखालील कोल्हापूर येथील श्रीमहालक्ष्मी मंदिर, श्रीजोतिबा मंदिर व सिंधुदूर्ग जिल्हयातील काही मंदिरांकडील दागिन्यांचे मुल्याकन सन २०१२-२०१३ मध्ये करण्यात आले असून त्याचे मुल्य रू.२४,६१,०३,९६६/- इतके आहे. तसेच ग्रामीण भागातील मंदिरांकडील दागिने अल्प प्रमाणात असून त्यांची माहिती संकलित करण्यात येत आहे.

देवस्थान व्यवस्थापन समितीचे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रूपये १४,६६,८३,०३७/- इतके आहे. देवस्थान समितीचे सन २००६-०७ या आर्थिक वर्षापर्यंत लेखापरीक्षण पूर्ण झालेले असून सन २००७-२००८ ते सन २०११-२०१२ अखेरचे लेखापरीक्षण करणेसाठी मे.कोचर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई या संविधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून त्यानुषंगाने सदर कालावधीचे लेखापरिक्षण सुरू आहे.

(३) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या कारभाराबाबत हिंदू विधिज्ञ परिषदेने केलेला तक्रार अर्ज शासनास प्राप्त झाला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**मुंबई आणि पुणे शहरात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही**
**कॅमे-यांपैकी अनेक कॅमेरे नादुरुस्त असल्याबाबत**

**(२५) * ५१९७ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शिरिषदादा चौधरी (अमळनेर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात वाहतूक व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यभरातील सर्वच शहरात सी.सी.टी.व्ही. बसविण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातील विविध महत्वाच्या ठिकाणी लावण्यात आलेले २५३७ सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे तसेच मुंबई व पुण्यातील महत्वाच्या ठिकाणी ६४८ कॅमेरे केवळ दिखाव्यासाठी उभे असल्याचे गृह विभागातील अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, २६/११ च्या घटनेनंतर घोषणा केलेल्या मुंबईत ५ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रकल्प उद्याप अपूर्ण असल्यामुळे मुंबईतील जनतेची सुरक्षा धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत तसेच जे कॅमेरे अगोदरच लावलेल आहेत त्यांच्या देखरेख व दुरुस्तीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) मुंबई मधील सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत उच्च स्तरीय शक्ती प्रदान समितीने दिनांक ५.१.२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये करार करण्यास मान्यता दिली आहे.
२), ३) व ४) शासनातर्फे पुणे व पिंपरी-चिंचवड शहरामध्ये ४४० ठिकाणी १२८५ कॅमेरे बसविण्याचे प्रस्तावित असून सद्यःस्थितीमध्ये १५९ ठिकाणी ३७३ सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. यापैकी बंद स्थितीमध्ये एकही कॅमेरा नाही.

मुंबई मध्ये ६०२० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत दिनांक ७.२.२०१५ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. मुंबई मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी ठिकाणी निश्चितीबाबत कंपनी मार्फत अद्याप सर्वेक्षण चालू आहे.

प्रकल्प कार्यान्वित झाल्यांतर संबंधीत कंपनी मार्फत पुढील ५ वर्षाकरिता सीसीटीव्हीची देखभाल व दुरुस्ती करण्यात येणार आहेत.
५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील अनधिकृत पार्किंगबाबत**

**(२६) * ७५६१ श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात वाहन पार्कींग शुल्क अन्य वाहनतळाच्या शुल्कापेक्षा खुप जास्त असून या शुल्कातून सुटका करुन घेण्यासाठी विमानतळाशी संबंधीत व्यवसाय करणाऱ्या टूरिस्ट गाड्या शेकडोंच्या संख्येने विलेपार्ले (पूर्व) भागातील रस्त्यांवर अनधिकृतपणे उभ्या केल्या जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनधिकृत पार्कींग केलेल्या गाड्यांमुळे विलेपार्ले (पूर्व) भागात वाहतूकीची कोंडी होत असून अशा गाड्यांवर वाहतूक पोलिसांमार्फत केवळ १०० रु. दंड आकारला जातो हा दंड विमानतळावरील पार्कींगसाठी लागणा-या शुल्कापेक्षा अत्यंत अल्प आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, अनधिकृत पणे उभ्या असणाऱ्या या गाड्यांचे चालक गल्लो गल्ली घोळक्याने उभे रहात असुन या परिसरातील वाढत्या चोऱ्यांमुळे नागरीकांमध्ये संशयाचे व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास , या अनधिकृत गाड्यांच्या पार्किंग विरोधात केवळ १०० रु. दंड न आकारता वाहतूक पोलिसांकडून ठोस कारवाई करणे अपेक्षित आहे अन्यथा गंभीर प्रकार घडण्याची शक्यता असल्याने याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) विलेपार्ले पूर्व भागातील काही रस्त्यांवर अनधिकृतपणे टूरीस्ट

गाड्या उभ्या केल्या जातात.

(२) मोटार वाहन कायद्यातील प्रचलित तरतुदीनुसार दंड आकारण्यात येतो.

(३) अशा प्रकारची बाब आढळून आलेली नाही.

(४) अनधिकृतपणे वाहने उभी करणा-या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे वाहतूक पोलीसांना अधिकार आहेत. त्याचप्रमाणे अशी अनधिकृत उभी केलेली वाहने टोईंग करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येते. वाहतूक पोलीसांकडून जानेवारी, २०१५ पासून १८९ नो - पार्किंग वाहने, ५१ डबल पार्किंग, ३८ कॉर्नर पार्किंग करणा-या वाहनांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी शहराला स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठा मिळण्याबाबत**

**(२७) * ११००५ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहराला स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठा मिळावा म्हणून सन २००६-०७ मध्ये वा त्या दरम्यान नगरपरिषदेने येलदरी धरणातून शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी येलदरी ते परभणी या १०४ कोटी रुपयांच्या पाणी पुरवठा योजनेला सन २००८ मध्ये मंजूरी देऊन ७ वर्षाचा कालावधी उलटूनही सदर योजना अपूर्णावस्थेत असल्याचे माहे डिसेंबर,२०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शहरातील जलकुंभावरील नळ आणि वॉल्व्हमधून मोठया प्रमाणात पाण्याची गळती होत असून दररोज लाखो लिटर पाणी गळतीद्वारे वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या विद्युत मोटारींच्या दुरुस्तीवर पाच वर्षात ३३ लाख रुपयाचा खर्च करण्यात आला असून विद्युत मोटारीची कायमस्वरुपी दुरुस्ती झाली नसल्याने पाणी टंचाईला सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशतः खरे असले तरी परभणी शहरास सुरळीतपणे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

**मुंबई एस.आर.ए (झोपू) मध्ये कोट्यावधीचा गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२८) * ८३७१ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.पराग अळवणी (विले पार्ले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील एस.आर.ए (झोपू) मध्ये कोट्यावधीचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एस.आर.ए प्राधिकरणाला जोगेश्वरीतील शिवदर्शन आणि जीवन ज्योती सोसायटी या दोन प्रकरणांमध्ये ८.६० कोटी रुपयांचा तोटा झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, झोपडपट्टी धारकांना ४५ हजार स्मार्ट कार्ड देण्याचे काम एका खाजगी एजन्सीला देण्यात आले होते, मात्र या एजन्सीने केवळ २२,३६१ एवढीच स्मार्ट कार्ड दिली, संबंधित कंत्राट मुदतीत पूर्ण न केल्याने कंपनीला सुमारे सहा लाख रुपये दंड भरणे आवश्यक असतांना त्यांच्याकडून तो वसूल केला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) निवासी लेखा परिक्षा अधिका-यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सन २०१२-१३ मध्ये केलेल्या निरीक्षणात शासन निर्णय गृहनिर्माण दिनांक २६.५.२००९ च्या तरतूदीनुसार विकासकाकडून वसूल करण्यात येणा-या अधिमूल्याची रकमेची चुकीच्या पध्दतीने गणना केल्यामुळे तोटा झाल्याचा आक्षेप नोंदविला होता. सदर आक्षेपास अनुसरुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ७.२.२०१४, दिनांक ११.२.२०१४ व दिनांक २३.२.२०१५ अन्वये विकासकडून वसूल करण्यात येणारी अधिमूल्याची रक्कम शासन अधिसूचना, नगर विकास विभाग दिनांक १६.४.२००८ व दिनांक २८.६.२०१२, तसेच शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दिनांक २.७.२०१० अन्वये करण्यात आलेली असून ती योग्य आहे अशा आशयाचा पूर्तता अहवाल लेखा अधिका-यांना पाठवून तो आक्षेप बंद करण्याबाबत कळविलेले आहे.
(३) व (४) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना वितरीत केलेल्या सदनिकांच्या संदर्भात दिनांक २०.९.२०१२ ते दिनांक १९.९.२०१३ या एक वर्षाच्या करार कालावधीमध्ये एकूण ४५,००० ओळखपत्र तयार करुन देण्याचे काम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने निविदा पध्दतीचे वापर करुन मे.स्मार्ट कार्ड आयटी सोल्यूशन्स लि. यांना दिले होते. त्यापैकी सदरहू एजीन्सीने कराराच्या कालावधीमध्ये एकूण २८,८८० सदनिका ओळखपत्रे तयार करुन दिलेली आहेत. या एजीन्सीने करारातील अटी व शर्तीनुसार विहित मुदतीत अपेक्षित एवढी ओळखपत्र तयार करुन न दिल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने देय होणारी दंडाची रक्कम रुपये

५,९८,७९९ /- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा करण्याबाबत दिनांक २१.४.२०१४ रोजी कळविले आहे. या प्रकरणासंदर्भात या एजन्सीची अनामत रक्कम रुपये २,२५,००० /- व देयकाची रक्कम रुपये ४,२३,७७४ अशी एकूण रुपये ६,४८,७७४ इतकी रक्कम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दापोली तालुक्यातील (जि.रत्नागिरी ) हर्णे या निर्यातक्षम मासळीसाठी प्रसिध्द असलेल्या बंदराला जेटी नसल्याबाबत**

**(२९) * ६१७५ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली तालुक्यातील (जि.रत्नागिरी ) हर्णे या निर्यातक्षम मासळीसाठी प्रसिध्द असलेल्या बंदराला जेटी नसल्याने बंदरातील कार्यरत सुमारे १००० मच्छिमारी नौकातील मासे किना-यावर आणणे, नौकेवर डिझेल व बर्फ आदि सामुग्री पोहोचवणे ही कामे करणे अडचणीचे ठरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंदरातील जेटी बांधकामाचा प्रस्ताव सुरुवातीला पत्तन विभागाकडे नंतर मेरिटाईम बोर्डाकडे आणि सन २०१४ मध्ये तो मत्स्यव्यवसाय विभागाकडे वर्ग करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावावार शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर कामाचा TEFR (Techno Economy Feasibility Report) केंद्र शासनास सादर करण्यात आला असून प्रकल्पाचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मालेगाव शहरातील क्रीडा संकुलाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३०) * ७५२४ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव महानगरपालिकेने (जि. नाशिक) क्रीडा संकुलाकरिता १६ एकर जमीन दिली असून तेथे क्रीडा संकुलाचे बांधकाम सुरू असतांनाच अर्धवट अवस्थेत काम सोडण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्रीडा संकुलाकरिता आवश्यक निधीची तरतूद केली नसल्याने सदरहू

काम अर्धवट स्थितीत असल्याने क्रीडापटूची तसेच क्रीडा रसिकांची क्रीडा संकुलाअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे  काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रामटेक (जि.नागपूर) येथील पर्यटन माहिती सुविधा केंद्र तसेच साहसी क्रिडा संकुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(३१) * ९५२८ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक (जि.नागपूर) येथील पर्यटन विकास महामंडळाकडून सुरु असलेले पर्यटन माहिती सुविधा केंद्र तसेच साहसी क्रिडा संकुलाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून याप्रकरणी संबंधित अधिका-यांकडे लोकप्रतिनिधींनी वारंवार कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निकृष्ट बांधकामाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधित ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत अहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२), (३) व (४) बांधकाम निकृष्ट दर्जाचे आढळून आले नाही. ठेकेदाराने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे कामे केली असल्याने ठेकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण तिसगांव नाका ते कल्याण (जि.ठाणे) रेल्वे स्टेशनपर्यंतच्या रस्त्यांच्या रूंदीकरण बाधीतांचे पूनर्वसन करण्याबाबत**

**(३२) * ६६५४ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण तिसगांव नाका ते कल्याण (जि.ठाणे) रेल्वे स्टेशनपर्यंतच्या रस्त्यांच्या रूंदीकरणामुळे या परिसरातील ७० ते ८० टक्के बाधीत नागरीक  बेघर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाधीत बेघर कुटुंबांची सन २००० पूर्वीची घरे तोडण्यात आली आहेत, त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, सन २००० सालापासून महानगरपालिकेकडून ५ कुटूंबाच्या घरांवर कारवाई करण्यात आलेली होती, ही कुटूंबे गेली १० वर्षे उघडयावर वास्तव्य करीत आहेत, यावर महानगरपालिकेने पुनर्वसनाचा कोणता निर्णय घेतला आहे,
(४) असल्यास, रूंदीकरणामुळे बेघर होणाऱ्या नागरिकांना त्यांच्या हक्काचा निवारा उपलब्ध करून देण्याकरिता लोकप्रतिनिधींनी आयुक्त, कल्याण-डोबिंवली महानगरपालिका यांना वारंवार पत्र करूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याने संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) होय, हे अंशतः खरे आहे.
२) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, दि.२२/०७/२०१४ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांनुसार दि.०१/०१/२००० अथवा त्यापूर्वी बाधीत झालेल्या कुटूंबांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.
३) व ४) कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेच्या पुनर्वसन धोरणानुसार ५० टक्के पेक्षा जास्त बाधीत होणा-या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले जाते. प्रश्नाधीन ५ प्रकल्पग्रस्तांपैकी श्रीमती शांताबाई बच्छाव यांना पुनर्वसनासाठी पात्र ठरविण्यात आले आहे. तथापी, त्या मयत झाल्याने त्यांच्या अधिकृत वारसाने अर्ज केल्यास त्या कुटूंबाचे महानगरपालिकेकडून पुनर्वसन केले जाईल. उर्वरीत ४ जणांची बांधकामे ही ५० टक्केपक्षा कमी बाधीत झाल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. ५० टक्के पेक्षा कमी बाधीत झालेल्या प्रकल्प बाधीतांची बांधकामे कमी प्रमाणात निष्कासीत करण्यात आली असल्याने त्यांना मुळ जागेतच महानगरपालिकेच्या परवानगीने दुरुस्ती करण्याची मुभा दिली जाते. त्यामुळे ते बेघर होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सबब महानगरपालिकेकडून याबाबत दुर्लक्ष झालेले नाही.
५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई तालुक्यातील (जि.पालघर) विस्तीर्ण समुद्रकिना-याला सुरक्षा रक्षक, लाईफ गार्ड, टेहळणी पोलीस नसल्याबाबत

**(३३) * ८४५४ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई तालुक्यातील (जि.पालघर) विस्तीर्ण समुद्रकिना-याला सुरक्षा रक्षक, लाईफ गार्ड, टेहळणी पोलीस नसल्यामुळे सागरी सुरक्षा धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने सागरी सुरक्षा तात्काळ कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) वसई तालुक्यातील सागरी किना-यावर व खाडी किनारी विशेष पोलीस नियुक्त करण्यात आले असून, पोलीस अधिकारी / कर्मचारी सागरी किनारी सतर्कतेने गस्त घालत आहेत. शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या ४ स्पीड बोटी यांचे माध्यमातून नियमितपणे सशस्त्र पेट्रोलिंग करण्यात येते. सागरी किनारी कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याकरीता पोलीस बंदोबस्त नेमून सागरी सुरक्षा अधिक दक्षपणे पार पाडली जाते. सागरी किनारी असलेले चेकपोस्ट, लँडीग पॉईंट, जेट्टी, खाडी किनारा येथे येणारे वाहन, बोटी, व्यक्तीं यांची कसून तपासणी केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माझगाव (मुंबई) येथील धनजीभाई चाळ पुनर्विकासामधील गैरव्यवहार व अनियमितता**

**(३४) * ५९३६ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगांव येथील दि.धनजीभाई चाळ सेवा संघाचा भु.क्र.६/१२४ व क्र. ३१२ येथील भुखंडावर विकासकाने विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करुन पुनर्विकासामध्ये गैरव्यवहार व अनियमितता केल्याबाबत तसेच शासनाचा महसूल बुडवून शासनाची फसवणूक केल्याबाबत सदर संस्थेने माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मुंबईतील माझगांव येथील दि.धनजीभाई चाळ सेवा संघाच्या भु.क्र. ६ /१२४ व क्र. ३१२ येथील भुखंडावर विकासकाने विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करुन पुनर्विकासामध्ये गैरव्यवहार व अनियमितता केल्याबाबत तसेच शासनाचा महसूल बुडवून शासनाची फसवणूक केल्याबाबत सदर संस्थेने माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये शासनाकडे तक्रार केल्याचे आढळून येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चारकोप-वांद्रे-मानखुर्द या मार्गावरील सुमारे १२ हजार कोटी खर्चाच्या मेट्रो २ प्रकल्पाबाबत**

**(३५) * ९७७७ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारकोप-वांद्रे-मानखुर्द या मार्गावर सुमारे १२ हजार कोटी खर्चाच्या मेट्रो २ प्रकल्पाचे तत्कालीन राष्ट्रपती मा.प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते सन २००९ मध्ये भूमिपुजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मेट्रो २ च्या कामाचे टेंडर मिळालेली रिलायन्स कंपनी आणि राज्य शासन यांनी "नो कॉस्ट ॲण्ड नो क्लेम्स" या तत्वावर हा करार रद्द केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर करार रद्द होण्याची कारणे काय आहेत व या कामाचे नव्याने टेंडर मागविण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) चारकोप व मानखुर्द येथील कारडेपोकरीता पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांनी किनारा नियमन (CRZ) क्षेत्रासंबंधातील घातलेल्या जटील अटींमुळे सवलतदाराने प्रकल्पाचे बांधकाम सुरु करण्यास असमर्थता दर्शविली, मेट्रो स्थानकावर वाणिज्यिक वापरासाठी आवश्यक असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल झालेला नाही व सदर उन्नत मार्गाकरीता काही स्थानिक रहिवाश्यांनी दर्शविलेला विरोध या कारणांमुळे सदर प्रकल्पाची भौतिक कामात प्रगती होत नसल्यामुळे सवलतदारासमवेत केलेला सवलत करारनामा संपुष्टात आला आहे. चारकोप - वांद्रे - मानखुर्द - मेट्रो मार्ग- २ हा दहिसर पर्यंत वाढवून सुधारीत दहिसर - चारकोप- वांद्रे - मानखुर्द या एकत्रित मार्गाचा मे.राईटस् या सल्लागारामार्फत माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये तयार करण्यात आलेला सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत शासनास प्राप्त झाला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरासाठी भामा आसखेड धरणातून करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनेबाबत**

**(३६) * ६६१५ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरासाठी भामा आसखेड धरणातून करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनेतूनच

आळंदी देवाची नगरपालिकेसह सहा गावांना पाणी मिळण्याकरिता माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरीकांनी संबंधित अधिकारी व विभागाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांना पाणी मिळण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) हे खरे नाही. असे कोणतेही निवेदन माहे जानेवारी, 2015 मध्ये नगरविकास विभागाकडे प्राप्त झालेले नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील के.ई.एम., नायर, सायन या तीन प्रमुख रूग्णालयांसह १८ उपनगरीय, २६ प्रसुतीगृहे आणि ५ विशेष रूग्णालयांमध्ये ४०० कार्यालयीन कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३७) * ८०६४ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील के.ई.एम, नायर व सायन या तीन प्रमुख रूग्णालयांसह १८ उपनगरीय, २६ प्रसुतीगृहे आणि ५ विशेष रूग्णालयांमध्ये ४०० कार्यालयीन पदे रिक्त असल्याची बाब दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) हे खरे नाही. मुंबईतील के.ई.एम., नायर व सायन या तीन प्रमुख रुग्णालयांसह बृहन्मुंबई महारनगरपालिकेच्या रुग्णालयांतील विविध संवर्गातील कार्यालयीन कर्मचा-यांच्या ५३१ पदांपैकी ९९ पदे रिक्त आहेत.

२) व ३) सदर रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही वेळोवेळी चालू असून सदर रिक्त पदे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राधान्याने भरण्यात येत आहेत.

-----------------

**नरिमन पॉईंट,मुंबई येथील सी.टी.एस.१५३ आणि १५०-अ या वाहनतळासाठी राखीव असलेल्या भूखंडावरील एस.आर.ए.योजनेबाबत**

**(३८) * ८५६५ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरिमन पॉईंट,मुंबई येथील सी.टी.एस.१५३ आणि १५०-अ या वाहनतळासाठी राखीव असलेल्या भूखंडावर एस.आर.ए.योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंड सी.आर.झेड-१ मध्ये येत असल्याने विकासकाने कायद्याचे उल्लंघन केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकासकाने १ ऐवजी १.६६ एफएसआयचा वापर करून इमारत उभारली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, पर्यावरण व एफएसआयचा नियमबाहय वापर करणाऱ्या विकासकाविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) नरिमन पॉईंट येथील भू.क्र. १९८० (पै) प्लॉट क्र. १५० (पै) व १५३ अे (पै) या मिळकतीवर महात्मा फुले सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.) या संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत असून त्यापैकी प्लॉट क्र. १५३ अे (पै) वर विकास नियोजन आराखड्यानुसार वाहनतळाचे आरक्षण आहे.

सदरहू योजनेमध्ये अंतर्भूत भूखंड सीआरझेड - II मध्ये आहे. सद्यःस्थिती या योजनेसंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि. १८.६.२०१४ च्या पत्रान्वये या योजनेतील इमारतीचे बांधकाम चालू ठेवण्यासंदर्भात महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीच्या कमिटीकडे स्पष्टीकरण मागितले आहे. तोपर्यंत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि. १७.६.२०१४ च्या पत्रान्वये विकासकास विक्री घटकाच्या इमारतीचे काम थांबविण्याची नोटीस दिली आहे.

(३) व (४) सदरहू योजनेस विकास नियंत्रण नियमावली ३३(१) परि. IV नुसार १.३३ झोनल चटई क्षेत्र निर्देशांक व नगर विभागाचे परिपत्रक दि. ४.११.१९८८ नुसार मंजूर चटईक्षेत्र निर्देशांकाच्या २५ टक्के असे एकूण १.६६ इतका चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) वरील प्रश्न भाग- १ व २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरणाने विकासकाला विक्री घटकाच्या इमारतीचे बांधकाम बंद करण्याची नोटीस दिली असून सध्या काम बंद आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेकडून होत असलेला दुषित पाणीपुरवठा**

**(३९) * ७७२४ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत अपुरा व दुषित पाणीपुरवठा होत असल्याप्रकरणी मुंबई महानगरपालिकेकडे ८६७ तक्रारी प्राप्त झाल्याचे माहे जुलै ते डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पाईपलाईन या जुन्या झालेल्या आहेत, तसेच बहुतांश ठिकाणी पाण्याच्या पाईपलाईन या सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्याच्या लगत आहेत, काही ठिकाणच्या पाईपला गळती लागलेली असल्याने नाल्यातील घाण पाणी पिण्याच्या पाण्यात मिसळत असल्याने पाणी दुषित होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईत होत असलेल्या पाणी पुरवठयाच्या तक्रारीनुसार शासनाने मुंबईतील नागरिकांना स्वच्छ पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, वाढीव पेयजलाच्या संदर्भातील पाण्याच्या निर्जंतुकीकरणाच्या संदर्भात कोणता धडककृती कार्यक्रम गठीत करण्यात आला वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे जुलै ते डिसेंबर, २०१४ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे दुषित पाणी पुरवठा होत असल्याच्या एकूण १५४८ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) हे अंशतः खरे आहे. मुंबई शहराला पाणी पुरवठा करणा-या काही जलवाहिन्या जुन्या झाल्या असल्या तरी त्या टप्प्याटप्प्याने बदलण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. तसेच दुषित पाणी पुरवठा रोखण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक प्रतिबंधक उपाययोजना बृहन्मुबई महानगरपालिकेतर्फे त्वरीत अंमलात आणण्यात येतात.
(३) जुन्या झालेल्या जलवाहिन्या कालबध्द कार्यक्रमातून बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे बदलण्यात येत आहेत. मागील तीन वर्षामध्ये मुंबई शहरातील ६८५९५ मीटर लांबीच्या जुन्या जलवाहिन्या बदलण्यात आल्या आहे आणि ५६६६० मीटर लांबीच्या जलवाहिन्यांचे पुनर्स्थापन करण्यात आले आहे. तसेच नाल्याच्या लगत असलेल्या जलवाहिन्यांच्या स्थानांतरणाची २७२ कामे मागील तीन वर्षात करण्यात आली आहेत. माहे जुलै ते डिसेंबर, २०१४ मध्ये जलजोडण्या/जलवाहिन्यांवरील एकूण २१२१५ गळत्या बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दुरुस्त करण्यात आल्या आहेत.
(४) सध्या मुंबई शहरात खंडीत पाणीपुरवठा करण्यात येत असल्यामुळे उर्वरित वेळेत जलवाहिनीमध्ये दुषित पाण्याचा शिरकाव होण्याची शक्यता असते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी तसेच मुंबईच्या पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी उपलब्ध जलस्त्रोतांचा पुरेपूर वापर करुन एकूण पाणीपुरवठा व्यवस्थेचा योग्य व एकात्मिक जल वितरण व्यवस्थापन कार्यक्रम बृहन्मुंबई महानगरपालिका राबवित आहे व त्यासाठी विना

महसूल पाण्याचे प्रमाण कमी करणे, गळती नियंत्रण करणे, समान पाणी वाटप, दाबाचे समानीकरण, पाण्याची गुणवत्ता सुधारणे व पाणी पुरवठा वेळेत वाढ या प्रमुख बाबी अध्यारुत आहेत. त्यासाठी सेवा उपलब्धीकाराची नियुक्ती एप्रिल, २०१४ मध्ये केली असून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच/पश्चिम व टी विभाग या दोन विभागात प्रायोगिक तत्वावर २४ तास पाणी पुरवठा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. या प्रयोगाच्या निष्कर्षावर उर्वरित विभागातील पाणी पुरवठ्याच्या तासांमध्ये टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात येईल. पाणी पुरवठ्याच्या वेळेच्या वाढीमुळे पाण्याच्या दुषितीकरणाचे प्रमाण कमी होईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई क्षेत्रात माथाडी कामगारांसाठी बांधलेली घरे**
**माथाडी कामगारांना उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४०) * ६९०८ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रात माथाडी कामगारांसाठी घरे बांधण्यात आली असूनही ती अद्यापी माथाडी कामगारांना उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची घरे माथाडी कामगारांना उपलब्ध करून द्यावीत म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना व मा.कामगार मंत्री महोदयांना जानेवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, माथाडी कामगारांना त्यांच्यासाठी बांधण्यात आलेली घरे उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही, कारण शासनाच्या अधिनस्त मुंबई विभागातील ७ माथाडी मंडळांच्या माथाडी कामगारांना नवी मुंबई क्षेत्रातील माथाडी कामगारांसाठी बांधलेल्या घरांचे सन १९७८ ते २०११ या कालावधीत एकूण ९११९२ घरांचे सिडकोच्या माध्यमातून वाटप करण्यात आलेले आहे. तसेच नगरविकास विभागाच्या दि. २० /६/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार अर्जदार कामगार मंडळात नोंदीत असल्याचे दाखले मंडळांमार्फत देण्यात आले असून सदर कामगारांचे अर्ज संघटनामार्फत सिडको यांना सादर करण्यात आले आहेत. सदर अर्जातून सोडतीद्वारे कामगारांना घरे वाटप करण्याची कार्यवाही सिडकोकडून सुरु आहे.
(२) अशा प्रकारे निवेदन या विभागास प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.
(३) वरील अ.क्र.१ मध्ये नमूद केल्यानुसार माथाडी कामगारांना घराचे वाटप करण्यात आले असून माथाडी कामगारांना सिडकोमार्फत घरे देण्याबाबत माथाडी मंडळांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

**उद्‌गीर नगरपालिकेतील नगरोत्थान विकास कार्यक्रमांतर्गत कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(४१) * ११४२५ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उद्‌गीर नगरपालिकेत (जि.लातूर) सन २०१३-१४ या वर्षात नगरोत्थान विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या रुपये ८१ कोटीच्या निधीतून फक्त ६० टक्के काम पूर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही कामे मर्जीतील ठेकेदारांना हाताशी धरुन व नियमबाह्य पध्दतीने निविदा काढण्यात आली आहे तसेच उद्‌गीर शहरातील रस्ते, नाले इत्यादी कामे करण्यापूर्वी पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन टाकण्याचे काम करणे आवश्यक असतांना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नगरपालिकेने खोटी कागदपत्रे सादर करुन बँक ऑफ महाराष्ट्रच्या उद्‌गीर शाखेतून दहा ते पंधरा कोटी रुपये कर्ज घेऊन त्यात गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी उद्‌गीर नगरपालिकेतील दोषी अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कारवाई करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत उदगीर नगरपरिषदेच्या रुपये ७७.०४ कोटी किंमतीच्या रस्ते विकास प्रकल्पास सन २०१२-१३ मध्ये शासनाने मान्यता दिली आहे. त्यापैकी राज्य शासनाकडून रुपये ६१.६३६० कोटी इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. प्रकल्पातील एकूण ५५ कामांपैकी २३ कामे पूर्ण झाली असून ०९ कामे प्रगतीपथावर असल्याचे मुख्याधिकारी उदगीर यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(२), (३), (४) व (५) विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्यामार्फत सदर बाबींची चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**मुंबईत म्हाडाच्या संक्रमण शिबिरात घुसखोरी करुन राहणाऱ्या घुसखोरांवर म्हाडाच्या नियमानुसार भाडे आकारण्याबाबत**

**(४२) * ८९६४ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत म्हाडाच्या संक्रमण शिबिरात घुसखोरी करुन राहणाऱ्या घुसखोरांवर म्हाडाच्या नियमानुसार भाडे न भरणाऱ्यांवर म्हाडाच्या आर.आर.बोर्डाने माहे जानेवारी, २०१५ च्या

पहिल्या सप्ताहात  कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) , (२) व (३) चे उत्तर

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरामध्ये घुसखोर/ अनधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांकडून दिनांक १/०४/२०१० पासून रुपये ३०००/- प्रति माह सेवा आकार वसूल करण्यासंबंधी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने दिनांक ०४/०२/२०१० रोजी ठराव क्रमांक ६४६२ नुसार धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. असे असले तरी संक्रमण शिबिरामध्ये वास्तव्य करीत असलेले घुसखोर /अनधिकृत रहिवाशी सेवा आकारापोटी रुपये ३०००/- अदा करीत नाहीत. सेवा आकाराची थकबाकी अदा करण्याबाबत संबंधित घुसखोर/अनधिकृत रहिवाश्यांना वैयक्तिकरित्या कळविण्यात येत आहे. तसेच संक्रमण शिबिरामध्ये फलक लावणे, मंडळाच्या कर्मचा-यांचे पथक निर्माण करुन त्या पथकामार्फत सेवा आकार वसूल करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे अशी कारवाई मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे करण्यात येत आहे. मंडळाने पाठपुरावा करुनही जे रहिवाशी रुपये ३०००/- प्रमाणे मागील सेवा आकार थकबाकीसह अदा करणार नाहीत त्यांच्या संक्रमण गाळ्याचे विद्युत व जलजोडणी खंडित करण्यात येईल तसेच त्यांच्याविरुध्द निष्कासनाची कारवाई करण्यात येईल.

-----------------

**अमरावती शहरात अवैध बांधकाम करणाऱ्या व्यावसायीकाविरुध्द कार्यवाही करण्याबाबत**

**(४३) * १०२८० डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील अनियमित बांधकामात दोषी आढळलेल्या १८७ पैकी २६ व्यावसायिकांविरुध्द फौजदारी कारवाई करण्यात आली असल्याने अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील अवैध बांधकाम व्यावसायिकांविरुध्द कारवाई करण्याची मागणी मा.पालकमंत्री अमरावती जिल्हा यांच्या महानगरपालिका आढावा बैठकीदरम्यान नगरसेवकाद्वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्वरुपाचे  एकूण किती अवैध बांधकाम अमरावती महानगरपालिका क्षेत्रात झाली आहेत,
(३) असल्यास, दोषी बांधकाम व्यावसायिकांविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) हे खरे नाही.

तथापी, अमरावती महानगरपालिकेत मा.पालकमंत्री अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती महानगरपालिका अधिकारी व पदाधिकारी यांच्यासह दिनांक २२.०१.२०१५ रोजी आढावा बैठकीत संयुक्तीक चर्चा करुन त्या अनुषंगाने सुचना खालील प्रमाणे देण्यात आलेल्या आहेत.

अ) हॉकर्स झोनचा प्रश्न तात्काळ निकाली काढणे अतिक्रमणे काढणे व अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे होणार नाही याची दक्षता घेऊन, अतिक्रमण विभागास आवश्यक स्टाफ उपलब्ध करुन देणे, दिड महिन्यात रस्त्यावर हात गाड्या लागणार नाहीत या संदर्भात दक्षता ठेवणे. अनधिकृत बसलेली ठिकाणे नियमात बसत असल्यास ती बसविण्याबाबत प्रशासकीय स्तरावर योग्य निर्णय करणे

आ) हॉटेल, मंगल कार्यालय, हॉलस् या ठिकाणी पार्कींगची जागेवर बांधकमे असल्यास ती पार्कींग करीता मोकळी व दंड बसुली करणे

२) ३) व ४) प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने दिनांक २२/१/२०१५ रोजी अमरावती महानगरपालिकेत झालेल्या बैठकीमध्ये मा.पालकमंत्री महोदयांनी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या प्रशासनाकडून कार्यवाही सुरु असुन, सर्व्हेक्षणाअंती सद्यःस्थिती ७० अनधिकृत मार्केट ची यादी तयार झालेली आहे. त्यातील २९ मार्केट ची तपासणी केली असून, ५ मार्केट मधील पार्कींगच्या जागेवरील अनधिकृत बांधकाम पाडण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. ०३ प्रकरणाबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या दृष्टीने पोलीस विभागास प्रकरण पाठवियात आले आहे. ०२ अनधिकृत बांधकाम प्रकरणात कार्यवाही पूर्ण झाली असून, ०६ प्रकरणात महानगरपालिकेच्या नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मध्य मुंबईतील ९२ एकर जमिनीवर वसलेल्या वरळी, शिवडी, नायगांव व ना.म.जोशी मार्गावरील ब्रिटीशकालीन बी.डी.डी.चाळीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(४४) * ६०७४ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संजय कदम (खेड दापोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मंगेश कुडाळकर (कर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य मुंबईतील ९२ एकर जमिनीवर वसलेल्या वरळी, शिवडी, नायगांव व ना.म.जोशी मार्गावरील ब्रिटीशकालीन बी.डी.डी.चाळीचा पुनर्विकास करण्याचा निर्णय शासनाने नुकताच माहे जानेवारी, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने म्हाडाला बी.डी.डी. चाळीचा पुनर्विकास करण्यासाठी तत्वतः मान्यता दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीडीडी चाळीच्या पुनर्विकास होण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) व (३) मुंबई विकास विभागामार्फत औद्योगिक कामगारांच्या निवासाची सोय म्हणून वरळी, नायगांव, डिलाईल रोड, (ना.म.जोशी मार्ग) व शिवडी येथे बांधण्यात आलेल्या इमारतींपैकी वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्ग येथील जमिनी राज्य शासनाच्या मालकीच्या असून शिवडी येथील जमीन मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीची आहे. सदरहू चाळींची पुनर्बांधणी / पुनर्विकास करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिडकोने (ता.उरण जि.रायगड) शेतकऱ्यांच्या जमिनी अनधिकृतपणे संपादित केल्याबाबत**

**(४५) * ७६२२ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) मेट्रो सेंटरच्या चुकीच्या पध्दतीमुळे शेतकऱ्यांच्या राहत्या घरांच्या जमिनी चुकीच्या पध्दतीने संपादीत करून सिडकोला हस्तांतरीत केल्यासंदर्भात परिसरातील प्रकल्पग्रस्तांना जमिनी ताब्यात देण्याचे आदेश तत्कालीन मुख्यमंत्री यांनी देऊनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने प्रकल्पग्रस्त हवालदिल झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळविण्याच्या दृष्टीने शेतकरी संघर्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना मेट्रो सेंटरच्या चुकीच्या पध्दतीने संपादित केलेल्या जमिनी परत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई प्रकल्पाकरीता भूसंपादन अधिनियम, १९९४ व त्याअनुषंगाने शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनाप्रमाणे संपादन करण्यात आलेले आहे. परंतु, चुकीच्या पध्दतीने संपादन करण्यात आलेले नाही. तसेच, जमीन परत करण्याबाबतचे कोणतेही आदेश नाहीत.
(२) होय.
(३) व (४) मेट्रो सेंटरकडून चुकीच्या पध्दतीने जमीन संपादन करण्यात आली नसल्याने परत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुळजाभवानी मंदिरातील संपत्तीची लुट करणा-या ठेकेदार, पुजारी व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(४६) * ७४६६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रसिध्द तुळजाभवानी मंदिरात १९८९ ते २००९ या वीस वर्षामध्ये १२० किलो सोने, ४८० किलो चांदी व २४० कोटी रुपयांची रोकड, ठेकेदार, पुजारी यांनी मंदिर प्रशासन अधिकारी यांच्या संगनमताने लाटल्याचे विशेष लेखापरीक्षकांच्या अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंदिरातील सोन्या चांदीच्या संपत्तीची लुट करण्यास प्रोत्साहन देणा-या तत्कालीन २३ जिल्हाधिका-यांची चौकशी करण्याची परवानगी सी.आय.डी.ने मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही,

शासनाच्या दि. १४/०५/२०१२ च्या आदेशानुसार प्रस्तूत प्रकरणाची चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे चालू असून अद्याप चौकशी पुर्ण झालेली नाही.

(२) नाही,

(३) प्रस्तूत प्रकरणी शासनाने दि. १४/०५/२०१२ च्या पत्रान्वये प्रकरण राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविले आहे.

(४) चौकशीच्या विलंबाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

I) सन १९९१ ते २००९ अशा २० वर्षाची प्रदिर्घ कालावधीची चौकशी आहे.

II) सदर २० वर्षातील तत्कालीन कार्यरत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तुळजाभवानी संस्थान यांचेकडून माहिती घेण्यात येत आहे.

III) सिंहासन दान पेटीसंबधाने उपलब्ध अभिलेखाचे लेखापरिक्षण अहवाल विशेष लेखा परिक्षकाकडून प्राप्त झाला असून त्यातील बाबींची पडताळणी करुन त्याप्रमाणे चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

**विरार - बोळींज (ता.वसई) येथील कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे सुमारे १८०० सदनिका बांधण्याबाबत**

**(४७) * ५४०२ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार - बोळींज (ता.वसई) येथील कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे सुमारे १८०० सदनिका बांधण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे, हे खरे आहे काय,

(२) वसई - विरार शहर महानगरपालिकेने पाणी पुरवठा करण्यास असमर्थता दाखविल्यामुळे कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने भूखंड वितरण प्रक्रिया थांबविली आहे, असे भूखंडाच्या सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांना जा.क्र. मि.व्य./को.मं./३६४३/२०११ अन्वये मिळकत व्यवस्थापक यांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०११ रोजी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई - विरार शहर महानगरपालिकेने पाणीपुरवठा उपलब्ध केल्यामुळे १८०० सदनिका बांधण्याच्या कामाला २ वर्षापूर्वी सुरुवात झालेली असूनही १० वर्षापुर्वी भूखंडाच्या सोडतीत यशस्वी झालेल्या व भूखंडाच्या किंमतीचा भरणा केलेल्या अर्जदारांना मात्र पाणी पुरवठा उपलब्ध नसल्याची सबब पुढे करुन भूखंडाचा ताबा देण्यास हेतूपुरस्सरपणे टाळाटाळ केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) या योजनेअंतर्गत अल्प उत्पन्न गटांतर्गत ३५४८ व मध्यम उत्पन्न गटांतर्गत १८५१ अशा एकूण ५३९९ सदनिका बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) अशी वस्तुस्थिती नाही.

(३) व (४) ५३४ भूखंडाच्या सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांनी भूखंडाच्या किंमतीचा पूर्ण भरणा केल्यानंतर अशा ३५२ लाभार्थ्यांना आतापर्यंत भूखंडाचा ताबा देण्यात आलेला आहे. तसेच उर्वरित लाभधारकांना भूखंडाचा ताबा देण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

-----------------

**पुणे शहरातून जाणाऱ्या मुळा-मुठा नदीमध्ये मोठया प्रमाणात सांडपाणी सोडल्याबाबत**

**(४८) * ९६६५ श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातून जाणाऱ्या मुळा-मुठा नदीमध्ये मोठया प्रमाणात सांडपाणी येत असून आवश्यक ठिकाणी मलनिःसारण प्रकल्प नसल्याने मुळा-मुठा नदीमधील प्रदूषण पातळी मोठया प्रमाणात वाढली असल्याने नदी पाण्यावर अवलंबून असलेल्या क्षेत्रातील नागरिकांचे आरोग्य

धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) पुणे महानगरपालिका मालकीचे मलनिःसारण प्रकल्प मुळा-मुठा नदीवर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) मुळा-मुठा नदीतील प्रदुषण कमी करणे वा नियंत्रित करण्यासाठी महानगरपालिकेने वा शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये दररोज ७४४ दशलक्ष लीटर एवढे मैलापाणी तयार होत असून महानगरपालिकेच्या एकूण १० मैलापाणी शुध्दीकरण केंद्रातून प्रतिदिन ५६७ दशलक्ष लीटर एवढ्या मैलापाण्यावर प्रक्रिया करण्यात येऊन उर्वरित १७७ दशलक्ष मीटर प्रतिदिन एवढे मैलापाणी प्रक्रियाविना नदीत सोडण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.
(२) होय.
(३) पुणे शहरात निर्माण होणा-या संपूर्ण मैलापाण्यावर प्रक्रिया करुन नदीत सोडणेकामी राष्ट्रीय नदी कृती कार्यक्रमांतर्गत प्रकल्प तयार करण्यात आला असून, सदर प्रकल्प जपान सरकारच्या जायका या संस्थेकडे सादर करण्यात आला आहे. सदरची योजना ३-४ वर्षाच्या कालावधीमध्ये राबविण्यात येणार असून सदर योजना पूर्ण झाल्यानंतर शहरात निर्माण होणा-या संपूर्ण मैलापाण्यावर प्रक्रिया करुन नदीत सोडण्याची तजविज आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिंतूर (जि.परभणी) येथील श्रीमती बोर्डीकर कन्या विद्यालय ही शाळा नगरपरिषदेची तसेच शासनाची परवानगी न घेता अवैधरित्या बांधण्यात आल्याबाबत

**(४९) * १०६०६ श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतूर (जि.परभणी) येथील श्रीमती बोर्डीकर कन्या विद्यालय ही शाळा नगरपरिषदेची तसेच शासनाची परवानगी न घेता अवैधरित्या बांधण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनधिकृत शाळेबाबत स्थानिक आमदारांनी तसेच सामान्य कार्यकर्त्यांनी नगरपरिषदेकडे तसेच शासनाकडे वारंवार तक्रारी करुन सुध्दा कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी अवैधरित्या बांधलेल्या शाळेवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) नाही.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ अन्वये शाळेवर नोटीस बजावलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विशेषतः गडचिरोली व गोंदिया जिल्हयातील**
**नक्षलवाद्यांच्या कारवाया रोखण्याबाबत**

**(५०) * ६५१३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नक्षलवाद्यांचा उपद्रव वाढत असून सध्याच्या परिस्थितीत संपूर्ण गडचिरोली जिल्हा तसेच गोंदिया जिल्हयातील चार तालुके नक्षलग्रस्त असल्याचे पोलिस महासंचालकांनी जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात नक्षलवाद्यांच्या कारवाया रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत, यासाठी शासनाने किती निधी उपलब्ध करून दिला आहे,

(३) निधी उपलब्ध करून दिला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शासनाने दिनांक २६.१२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये संपूर्ण गडचिरोली जिल्हा व गोंदिया जिल्ह्यातील चार तालुके नक्षलग्रस्त असल्याचे घोषित केले आहे. तथापि, सदर शासन निर्णयास दिनांक १८.०२.२०१५ रोजी स्थगिती देण्यात आली आहे.

(२) नक्षलवाद्यांच्या कारवाया रोखण्यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे उपयायोजना केल्या आहेत -

१) शासनाने नक्षलवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक ती शस्त्रे व दारुगोळा याबरोबर आधुनिक संपर्क व्यवस्था, वाहन व्यवस्था, भुसूरुंग प्रतिबंधक वाहने व हेलिकॉप्टर उपलब्ध करुन दिले आहेत.

२) जिल्ह्यातील नक्षलवाद्यांच्या कारवायांवर अंकुश लावण्यासाठी जिल्हा पोलीस तसेच केंद्रीय राखीव पोलीस बल यांच्या माध्यमातून नक्षलविरोधी अभियान राबविण्यात येते. तसेच एरिया डॉमिनेशन कार्यवाही करुन नागरीकांना सुरक्षा प्रदान करण्यात येत आहे.

३) जिल्ह्यात नक्षलविरोधी कृतीकरिता केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालियन, कोब्रा बटालियन, राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या व जिल्हा पोलीस दल तसेच सी- ६० च्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. जवानांना युध्दप्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. नक्षलविरोधी शोध अभियान, गस्त, नाईट ॲम्बुश, नाकाबंदी यामुळे

नक्षलवाद्यांच्या हालचालींवर प्रतिबंध आणण्यात येत आहे.

विशेष पायाभूत सुविधा योजनेअंतर्गत शासनाने आतापर्यत रु. १९.४२ कोटी निधी मंजूर केला असून सुरक्षा विषयक खर्च योजनेअंतर्गत सन २०१४-१५ मध्ये रु. २५.३० कोटी अनुदान मंजूर केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे शहरातील वर्तकनगर येथील पोलीस वसाहतीची अवस्था वाईट झाल्याबाबत**

**(५१) * ९३८८ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील वर्तकनगर येथील १९६० ते १९७० च्या दशकामध्ये म्हाडाच्या माध्यमातून बांधलेल्या पोलीस वसाहतीची अतिशय वाईट अवस्था झाली असून त्या वसाहतीत पोलिसांची कुटुंबे अत्यंत धोकादायक स्थितीत राहत आहेत. सदर घरे पोलीसांना कायमस्वरुपी मोफत उपलब्ध करुन देण्यात यावीत, अशी मागणी दिनांक ८/१२/२०१४ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना एका पत्राद्वारे केली आहे हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या अन्य परिमंडळातील काही पोलीस वसाहती जुन्या तसेच जीर्ण झालेल्या असून त्यांची अवस्थाही दुरुस्ती करण्यापलिकडे आहे. त्यामुळे राहण्यायोग्य निवासस्थानांची संख्या कमी असल्याने वर्तकनगर पोलीस कर्मचा-यांची पर्यायी व्यवस्था तातडीने होवू शकत नाही. त्यामुळे वर्तकनगर पोलीस वसाहती रिक्त करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. सद्यस्थितीत ठाणे महानगरपालिकेकडून अतिधोकादायक जाहीर केलेल्या एका इमारतीमधील पोलीस कर्मचा-यांची पर्यायी निवासस्थानाची व्यवस्था करुन सदर इमारत रिक्त करण्यात आलेली आहे. पोलीस कर्मचा-यांना वितरीत केलेली निवासस्थाने मालकी हक्काने करण्याचे शासनाचे धोरण नाही. पोलीस निवासस्थाने मालकी हक्काने वितरीत केल्यास भविष्यात पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना निवासस्थाने उपलब्ध होणार नाही.

-----------------

**सोलापूर महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करुन दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना आर्थिक लाभापासून वंचित ठेवल्याबाबत**

**(५२) * ८९३५ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करुन दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना देण्यात येणाऱ्या आर्थिक लाभाच्या खात्यातून २८ लाख १० हजार रुपयांचा बँक ऑफ इंडियांच्या विविध शाखानी गैरव्यवहार केले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणातील दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, ,
(४) लाभार्थ्यांना आर्थिक लाभाची रक्कम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1), (2) व (3) या प्रकरणी सहायक आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी दिलेल्या फिर्यादिवरुन सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हा रं.क्र. 412/2014भा.द.वि.क.420,463,464,465,468,469,470,471,472,473,474,475,484,488, 120ब,34 प्रमाणे दि. 25/12/2014 रोजी गुन्हा दाखल केला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(4) सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत दारीद्रयरेषेखालील वैयक्तीक स्वयंरोजगार व महिला व बालके बचत गट समूहाअंतर्गत लाभार्थ्यांना सन 2013-14 या वर्षात लाभाची रक्कम दिली आहे.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील ठाकुर्ली येथील बावनचाळ भागातील झाडांची कत्तल केल्याबाबत**

**(५३) * ११४४९ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील एकमेव हरीतपट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठाकुर्ली येथील बावनचाळ भागातील ६३ झाडांची कत्तल करुन मध्य रेल्वे प्रशासनाने रेल्वे सुरक्षा दलाच्या कवायतीसाठी मैदान तयार केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेल्वे प्रशासनाने अधिक २५० झाडांची कत्तल करुन ॲथलेटिक्स आणि हॉकीचे मैदान तयार करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वृक्षतोड करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने शासनाची वा कल्याण-डोंबिवली

महानगरपालिकेची परवानगी घेतली आहे काय,
(४) असल्यास, सदर परवानगी कोणत्या अटी व शर्तीनुसार देण्यात आली आहे व परवानगी न घेता झाडांची कत्तल करण्यात आली असल्यास मध्य रेल्वे प्रशासनावर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

कल्याण- डोबिवली महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण सभा क्र.०३, दिनांक २१/१०/२०१३, ठराव क्र.११ अन्वये या परिसरातील कवायती मैदानाच्या विकास कामात बाधीत होणारी ६१ झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देण्यात आली आहे.
(२) नाही,

रेल्वे प्रशासनाने या परिसरात अॅथलेटिक्स व हॉकीचे मैदान विकसित करण्याकरीता १७९ झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाकडे परवानगी मागितली आहे.
(३) महानगरपालिकेकडून अद्याप अशी परवानगी देण्यात आलेली नाही.
(४) अद्याप परवानगी देण्यात आलेली नसल्याने परवानगी न घेता झाडांची कत्तल केलेली नाही.

-----------------

**ठाणे जिल्हयातील कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रालगतच्या २७ आणि भिवंडी परिसरातील ६० गावांचा प्रारुप विकास आराखड्याबाबत**

**(५४) * १०५९४ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रालगतच्या २७ गावांना आणि भिवंडी परिसरातील ६० गावांचा प्रारुप विकास आराखड्याला दिनांक ३० डिसेंबर,२०१४ रोजी मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रारुप विकास आराखड्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली तसेच परिसरातील नागरीकांच्या समस्या सोडविण्याच्यादृष्टीने सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. तथापि याबाबतची अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यामध्ये आहे.
(२) व (३) सदर विकास योजनेमध्ये नियोजन प्रमाणकानुसार तसेच शहर स्तरिय प्रश्न,

विद्यमान सार्वजनिक सुविधा, विद्यमान पायाभूत सुविधा विचारांत घेऊन १० वर्षानंतरची प्रक्षेपीत लोकसंख्या विचारांत घेऊन, सार्वजनिक सेवासुविधांसाठी आरक्षणे निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच २० वर्षानंतरची प्रक्षेपीत लोकसंख्या विचारात घेऊन वापर विभाग निश्चिती करण्यांत आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील भोसरी येथील मुलीने छेडछाडीला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत**

**(५५) * ६५५९ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.विजय काळे (शिवाजी नगर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील भोसरी येथे छेडछाडीला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास रूग्णालयात मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोसरी भागातील या मुलीला सचिन चव्हाण, अकीब शेख व बाबू नायक हे त्रास देत असल्याबाबतची तक्रार मुलींने व तिच्या वडिलांनी पोलिसांत दिली असता पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली नसल्याने उपरोक्त मुलींने आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषी व्यक्ती व तक्रार नोंदवून न घेणा-या पोलिस अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ पूर्वी मयत मुलगी अथवा तिचे कुटुंबिय आरोपी त्रास देत असल्याची तक्रार देण्याकरीता पोलीस ठाण्यामध्ये आले नव्हते मात्र फिर्यादी तक्रार देण्याकरिता भोसरी पोलीस ठाण्यात दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी आल्या असता, फिर्यादी यांची तक्रार त्यांनी सांगितल्याप्रमाणे न घेता गुन्ह्याचे स्वरुप कमी करुन पोलीसांनी अदखलप्राप्त गुन्हा नोंदिवला होता. तथापि, मयत मुलगी व तिच्या वडीलांनी पोलीसांना तक्रार दिली असतानाही पोलीसांनी ती नोंदवून घेतली नाही म्हणून सदरच्या मुलीने आत्महत्या केली अशी बाब तपासात निष्पन्न झालेली नसून, आरोपी त्रास देत असल्याने मुलीने आत्महत्या केल्याची फिर्याद मुलीच्या आईने दिली आहे.

(३) व (४) मयत मुलीच्या आईच्या फिर्यादीनुसार आरोपीविरुध्द भोसरी पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३५४, ३५४ (ड), ३२३, ५०४,३०५, ३०६, ३४ बालकांचे लैंगिक गुन्ह्यापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ११(१), १२ नुसार गु.क्र. ३/२०१५ नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास करुन न्यायालयात दि.२३.२.२०१५ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात

आले आहे. ३१ डिसेंबर, २०१४ रोजी फिर्यादी तक्रार देण्याकरीता भोसरी पोलीस ठाण्यात आल्या असता, फिर्यादी यांची तक्रार त्यांनी सांगितल्याप्रमाणे न घेता गुन्ह्याचे स्वरुप कमी करुन अदखलपात्र गुन्हा नोंदविला व आरोपीविरुध्द आवश्यक ती कारवाई केली नाही या कर्तव्यातील कसुरीबाबत श्री.बी.ए.पांढरे, सहायक पोलीस निरीक्षक, श्रीमती एस.एच.भागवत, पोलीस उप निरीक्षक यांना दिनाक १९.१.२०१५ रोजी निलंबित करण्यात आले आहे तसेच, श्री.आर.पी.कुंटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व श्री.डी.पी.शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांदिवली येथील महावीर येथील राजरत्न केशर आशिष या सहकारी गृहनिर्माण संस्थेची नस्ती गहाळ झाली असल्याबाबत

**(५६) * ११६७९ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील कांदिवली येथील महावीर येथील राजरत्न केशर आशिष या सहकारी गृहनिर्माण संस्थेला १६- अ अंतर्गत म्हाडाने सि.टी.के/१ पैकी ८९७६ मिटरचा भूखंड २००३ साली अल्प उत्पन्न गटासाठी वितरित करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेमध्ये ८८ बनावट सभासद घेण्यात आले तसेच शासनाच्या प्रचलित नियमानुसार १० टक्के सदनिका या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी राखून ठेवणे बंधनकारक असतांनाही नियमांची पायमल्ली केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विकासकाने १६ - अ अंतर्गत मंजूरी देण्यात आलेली नस्ती म्हाडा विभागाकडून गहाळ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) त्यानुसार संबंधित विकासकांवर व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे आहे.

मौजे कांदिवली येथील मुंबई मंडळाच्या महावीर नगर वसाहतीजवळील न.भू.क्र.१ क/१ पैकी असलेल्या सुमारे ८९७६.०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड नियम १६ अंतर्गत राजरत्न सहकारी गृहनिर्माण संस्थेस वितरित करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

सदरहू संस्थेने नोंदणी करताना ८८ पात्र सभासदांची यादी अंतिम करण्यात आली आहे. तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार संस्थेने १०% सदनिका शासकिय कर्मचा-यांकरीता राखून ठेवण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात विशेषतः ठाणे, मुंबई शहरात एमडी या ड्रग विक्रीचे प्रमाण वाढले असल्याबाबत**

**(५७) * ६४२६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः ठाणे, मुंबई शहरात एमडी या ड्रगचे विक्री करण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील पायधुनी पोलीस ठाण्यांतर्गत पोलिसांनी केलेल्या कारवाईत रू.८० लाखाचे एमडी (मेटाड्रोन) हा विषारी पदार्थ जप्त करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मुंबईतील वांद्रे पश्चिम येथील पाली हिल या विभागात विद्यार्थ्यांना एमडी हा विषारी पदार्थ सहज उपलब्ध होत असल्याने ड्रग सेवनाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले असल्यामुळे पाली हिल रेसिडेन्ड असोशिएशनने खार पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एमडीसारखे विषारी पदार्थांची विक्री करणा-यांवर शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) मुंबईतील पायधुनी पोलीस ठाण्यांतर्गत पोलीसांनी केलेल्या कारवाईत रू.८० लाखाचे एमडी (मेटाड्रोन) पदार्थ जप्त केले नसून रु.८० लाखाचे ९९० ग्रॅम एम.फेटामाईन हस्तगत केले आहे.
(३) नाही.
(४) राज्य शासनाने दि.२.९.२०१४, दि.७.१.२०१५, व दि.१३.२.२०१५ च्या पत्रान्वये केंद्र शासनास मेफेड्रोन (M.D.) चा समावेश NDPS कायदा, १९८५ मध्ये करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार केंद्राच्या वित्त मंत्रालयाच्या अधिनस्त असलेल्या राजस्व विभागाने दि.५.२.२०१५

च्या अधिसूचनेन्वये मेफेड्रोन (M.D.) नामक पावडरचा NDPS, १९८५ च्या भाग २ मधील परिशिष्ट १ मध्ये क्र.११० -B मध्ये "MEPHEDRONE" या नावे समावेश करण्यात आला आहे. त्यानुषंगाने एमडीसारखे विषारी पदार्थांची विक्री करणा-यांविरूध्द राज्य पोलीस विभागामार्फत भा.द.वि.क.३२८, २८४,३४ प्रमाणे कारवाई करण्यात येत आहे. तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्षातर्फे जानेवारी-२०१५ पासून महाविद्यालयामध्ये ड्रग फी कॅम्पस तसेच पोलीस विभागामार्फत विविध शाळा कॉलेज येथे जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्यात येऊन त्यांना सदर पदार्थाच्या दुष्परिणामांबाबत कळविले जाते. तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांनाही मार्गदर्शन करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विक्रोळी (मुंबई) येथील हरियाली गावातील एका विकासकाने डीपी रोड बंद केल्याबाबत**

**(५८) * ५५५४ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (मुंबई) येथील हरियाली गावातील एका विकासकाने डीपी रोडच बंद केल्यामुळे विद्यार्थी व रहिवाशांचे हाल होत असून अशा विकासकावर कारवाई करण्याऐवजी महानगरपालिका प्रशासनाने अभय देत चक्क ओसी दिली असल्याचे माहे जानेवारी,२०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विक्रोळी पूर्व हरियाली गावातील एका विकासकाने महानगरपालिका प्राथमिक शाळा आणि क्रिडांगणाचे आरक्षण होते, विकासकाने दोन्ही आरक्षणाचे स्थलांतर करतांना फक्त प्राथमिक शाळेचे आरक्षण दिले आणि त्याजागी शाळेऐवजी आता डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय ॲण्ड ज्युनियर कॉलेज विकास हायस्कूल ॲण्ड इंजिनियर कॉलेज कार्यरत आहे, महानगरपालिका ज्यावेळी अशा सुविधा जागा ताब्यात घेते, त्यावेळी डीपी रोड सुध्दा बनविणे विकासकावर बंधनकारक असते आणि त्यानंतरच इमारतींना ओसी दिली जाते अशी सरळ आणि साधी प्रक्रिया असतांना पूर्व उपनगरातील इमारत आणि प्रस्ताव विभागातील अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (३)

संदर्भाधीन अभिन्यास हा नामनिर्देशित प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान तसेच ९.१५ मी. रुंद विकास नियोजन रस्त्याने बाधित आहे.

सदर अभिन्यासातील नामनिर्देशित प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान जमिन धारकाच्या विनंतीनुसार पुनर्स्थापित करण्यात आलेली आहेत.

नामनिर्देशित प्राथमिक शाळेस विकास परवानगी दि. ३० /०७/२००१ अन्वये देण्यात आलेली आहे. तसेच नामनिर्देशित प्राथमिक शाळेचे पूर्नबांधणी करुन विकासकाने दि. १०/१२/१९९९ रोजीचे करारनाम्यानुसार ती संबंधित शिक्षणसंस्थेस हस्तांतरीत केलेली असून त्यास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

तसेच खेळाच्या मैदानाखालील जमिन, ६.१० मी. रुंदीच्या पोहोच मार्गासह मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

सदर भूखंडावरील प्राथमिक शाळा पुनर्स्थापित झाल्यामुळे त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय ॲण्ड ज्युनिअर कॉलेज कार्यरत आहे.

विकास नियोजन रस्त्याचा भाग असलेला न.भू.क्र. २८३ येथे रस्ता बंद करण्यात आलेला आहे. तथापि हा रस्त्याचा भाग मंजूरी दिलेल्या अभिन्यासाचा भाग नाही. रस्त्यासाठी जमीन हस्तांतरीत करणेसंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेने जमीन मालकांस कळविलेले आहे. परंतु त्यास संबंधितानी प्रतिसादर दिलेला नसल्याने रस्त्याखालील जमीन भूसंपादित करणेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून स्वतंत्र प्रस्ताव तयार करणेत येत आहे, अशी वस्तुस्थिती आहे.

-----------------

## नगरपरिषद वरोरा (जि.चंद्रपूर) यांना सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रस्ता अनुदान वितरित करण्याबाबत

**(५९) * ८६५० श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपरिषद वरोरा (जि.चंद्रपूर) यांना सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रस्ता अनुदान वितरित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना एक लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नगरपरिषद बरोरा (जि.चंद्रपूर) यांना सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रस्ता अनुदानापोटी द्यावयाची रु. २,०४,९४,४३७ /-इतकी रक्कम जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना शासन निर्णय दि. ५ सप्टेंबर, २०१४ अन्वये वितरीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**देवळाली (जि.नाशिक) येथील उपनगर पोलिस ठाण्यावर लष्करी जवानांनी हल्ला केल्याबाबत**

**(६०) * ६६३३ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी (पूर्व)) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळाली (जि.नाशिक) येथील उपनगर पोलिस ठाण्यात एका लष्करी अधिका-याच्या नातेवाईकांवर गुन्हा दाखल केल्याने दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास २० ते २५ लष्करी जवानांनी हल्ला चढवून पोलीस ठाण्याची नासधूस तसेच तेथील पोलीस कर्मचा-यांना मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी या लष्करी जवानांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रकरणी उपनगर पोलीस ठाणे नाशिक येथे गु.र.नं. २४ /१५ भा.द.वि. कलम १२० (ब), १४३, १४७, १४९,३४२, ३४३, ३३२, ३५४, ४५२, ४२७, ५०४, ५०६ सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम १९९५ कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी १८ लष्करी अधिकारी यांना दि. १४ /०१/१५ रोजी अटक करुन दि. १५/०१/१५ रोजी न्यायालयापुढे हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. सद्यःस्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**मेट्रोच्या तिसऱ्या टप्पातील मुंबईतील नरिमन पॉईंट येथील विधान भवना जवळील स्थानकासाठी ८ राजकीय पक्षांनी कार्यालये सोडण्याबाबत**

**(६१) * ६०४४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनिल राऊत**

**(विक्रोळी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मेट्रो-३ अर्थात कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मुंबईतील पहिल्या भुयारी मार्गिकेसाठी दक्षिण मुंबईतील गिरगाव भागातील २०० च्या वर चाळी व शहिद भगतसिंग आणि फ्री प्रेस या मार्गावरील शासकीय कार्यालये तसेच विविध राजकिय पक्षांना दिलेली कार्यालये हटविण्यात येणार असल्याचे जानेवारी,२०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागातील असलेल्या चाळी व कार्यालयांचे पुनर्वसन करण्याचा आराखडा एमएमआरडीएने तयार केला आहे काय व गिरगावातील २०० चाळींमधील रहिवाश्यांचे पुनर्वसन गिरगावातच करण्यात यावे तसेच राजकीय पक्षांच्या कार्यालयात राज्यभरातील नागरिक येत असताना त्यांचे हित पाहून मंत्रालयासमोरील बंगल्यामध्येच पक्ष कार्यालयांना जागा उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मागणी पक्ष कार्यालयांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मेट्रो - ३ च्या विधान भवन स्थानकासाठी या परिसरातील काही शासकीय कार्यालये तसेच विविध राजकीय पक्षांना दिलेली कार्यालये हटविण्यात येणार आहेत. तथापि गिरगाव स्थानकासाठी गिरगाव भागातील २०० च्या वर चाळी हटविण्यात येणार आहेत ही बाब खरी नाही.

(२) गिरगाव स्थानकासाठी बाधित इमारतीमधील रहिवाशांसोबत चर्चा करुन त्यांचा पुनर्वसनाबाबतचा आराखडा तयार करणे प्रस्तावित आहे तसेच शहिद भगतसिंग मार्ग आणि फ्री प्रेस मार्गावरील शासकीय कार्यालये व राजकीय पक्ष कार्यालये स्थलांतराचा व पर्यायी पुनर्वसनाचा आराखडा तयार करण्यात आला असून त्या अनुषंगाने संबंधिताशी चर्चा चालू आहे. या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाने आयोजित केलेल्या बैठकीत राजकीय पक्षांद्वारे अशी मागणी करण्यात आली आहे.

(३) खाजगी इमारती, पक्ष कार्यालय व शासकीय कार्यालय यांचे पुनर्वसन नजिकच्या परिसरात भाडे तत्वावरील इमारतीमध्ये करण्याचा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा प्रस्ताव असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करवीर तालुक्यातील (जि.कोल्हापूर) निवासी मतिमंद शाळेतील मुलींवर अत्याचार केल्याबाबत**

**(६२) * ६३६४ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करवीर तालुक्यातील (जि.कोल्हापूर) एका निवासी मतिमंद मुलांच्या शाळेत अनाथ मतिमंद मुलींवर शाळेच्या संस्था चालकांच्या नातेवाईकानेच लैंगिक अत्याचार केल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मतिमंद मुलींच्या असहायतेचा फायदा घेत हा निंदणीय प्रकार दडपण्याचा प्रयत्न शाळेच्या संस्था चालकांकडून होत असल्याचेही निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, व शाळेच्या संस्था चालक व दोषी व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) व (2) परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील अंकूर मतिमंद वसतिगृहाची समाज कल्याण निरीक्षक यांनी वसतिगृह संस्थापक अध्यक्ष, मुलीं व कर्मचारी यांचेकडे चौकशी केली असता, वसतिगृहात नेहमी मुक्कामासाठी येणा-या विशेष शिक्षकाने दिनांक 3.1.2015 रोजी तीन मतिमंद मुलींशी अश्लील चाळे करुन त्यांचा विनयभंग केल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदरचा प्रकार दडपण्याचा प्रयत्न शाळेच्या संस्था चालकांकडून झालेला दिसून आला नाही.
(3) व (4) होय. सदर प्रकरणी जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार या आरोपी विशेष शिक्षका विरुध्द करवीर पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम 354,354(ब) नुसार गु.क्र. 18/2015 नोंदविण्यात आली असून, गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे आरोपी सध्या न्यायालयीन कस्टडीमध्ये आहे
(5) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**नाशिक सिडको येथे पेलियन पार्कचा भुखंड विनावापर पडून असल्याबाबत**

**(६३) * ९१९३ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक सिडको येथे पेलियन पार्कची उभारणी केलेला मात्र सध्या अस्तित्वात नसलेल्या पार्कचा १७ एकर भूखंड हा विनावापर पडून असल्याबाबतचे निवेदन स्थानिक संघटनेने मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंड स्थानिक प्रशासनाने या पार्कसाठी कंत्राटदारास कराराने दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पार्कच अस्तीत्वात नसल्याने संबंधित कंत्राटदारासमवेत झालेला करार स्थानिक प्रशासनाने रद्द केला आहे काय,
(४) नसल्यास, करार रद्द न करण्यामागील नेमकी कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) असे निवेदन मा.मंत्री (महसूल) महोद्यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) पेलिकन पार्क उद्यान खाजगीकरणातून विकसित करण्याकरिता नाशिक महानगरपालिकेने खाजगी कंत्राटदारासोबत दिनांक ३० ऑक्टोबर, १९९५ रोजी करारनामा केला होता. मात्र, कंत्राटदाराने करारनाम्यातील अटी - शर्तीचा भंग केल्याने सदर करारनामा दिनांक १५ नोव्हेंबर, २००३ रोजी महानगरपालिकेने रद्द केला आहे. सदरची बाब कंत्राटदाराने मा.न्यायालयात आव्हानीत केली असून या प्रकरणी मा.न्यायालाने जैसे थे आदेश दिले असल्याने प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) येथील गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून एका खासगी गोदामातून शासकीय धान्य जप्त केल्याबाबत

**(६४) * ५६१२ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखाडा बाळापूर (जि.हिंगोली) येथील गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून एका खासगी गोदामातून शासकीय धान्य जप्त केल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या या कारवाईमुळे स्थानिक पोलीस सदरील प्रकरणी कारवाई करण्यास दुर्लक्ष करीत आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गुप्त बातमीवरुन स्थानिक गुन्हे शाखा हिंगोली व पोलीस स्टेशन बाळापूर येथील पोलीस पथकाने संयुक्तरित्या दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी बाळापूर येथील खाजगी गोदामात विनापरवाना गैरकायदेशीररित्या शासन नियंत्रित स्वस्त धान्य दुकानाचा माल साठवून ठेवल्याने जिवनावश्यक वस्तू अधिनियमानुसार छापा टाकून कारवाई केलेली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

प्रकरणी बाळापूर आखाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३०३४/२०१४ कलम ३, ७, जिवनावश्यक वस्तू अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखा हिंगोली हे करत आहेत. सदर छाप्यात स्वस्त धान्य दुकानाचा माल गहू १०० क्विंटल तांदूळ ३०६ क्विंटल, वजन काटा मशीन, पॅकींग शिलाई मशीन इत्यादी रु.७,१८,७०० चा माल जप्त केला आहे. तसेच या प्रकरणी महसूल विभागाचे संबंधित पुरवठा अधिकारी,

मंडळ अधिकारी यांची चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना अहवाल पाठविण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**पुणे शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन पूर्व पुण्याची नवीन हडपसर महानगरपालिका निर्माण करण्याबाबत**

**(६५) * १०८६३ श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन पूर्व पुण्याची नवीन हडपसर महानगरपालिका निर्माण करावी अशी लेखी मागणी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १६/१२/२०१४ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी स्वरुपात केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १९९७ साली २३ गावांचा समावेश पुणे महानगरपालिकेमध्ये झाल्यानंतर १४ वर्षात या गावांचा विकास नियोजनबध्द पध्दतीने व गतीने होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आता पुन्हा पुणे महानगरपालिकेमध्ये ३४ गावे समाविष्ठ करण्यासाठी प्रस्तावित आहेत, परंतू पुणे शहराच्या भौगोलिक विस्तारात मोठी वाढ होऊन याचा ताण मोठ्या प्रमाणावर प्रशासनावर पडणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे शहरामधून नवीन हडपसर महानगरपालिका करण्याच्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी नवीन हडपसर महानगरपालिका निर्माण करावी अशी लेखी मागणी दिनांक १६.१२.२०१३ रोजीच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात केली आहे.
(२) पुणे शहरात नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या प्रारुप विकास आराखड्यातील नियोजनानुसार या भागात टप्याटप्याने विकास सुरु असून या भागातील बहुतांश विकास योजना, रस्ते, आरक्षणे यांचे विकसन झालेले आहे.
(३) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करावयाच्या ३४ गावांबाबतची कार्यवाही सुरु असून त्यानुसार पुणे शहराचा भौगोलिक विस्तारात होणारी वाढ विचारात घेऊन प्रशासनावरील ताण कमी करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात येईल.
(४) सदर प्रस्तावाबाबत जिल्हाधिकारी पुणे व आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे महापालिका शिक्षण मंडळातील सेवा निवृत शिक्षकांच्या नावा ने बोगस कर्ज मंजूर करुन रक्कमेचा केलेला अपहार**

**(६६) * ८८५८ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांनी शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी (पीएम) मध्ये कोटयावधी रुपयांचा घोटाळा केला असल्याचे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवानिवृत्त शिक्षकांच्या नावाने बोगस कर्ज प्रकरणे मंजूर करून या कर्जाची रक्कम हडप केली आहे, बोगस कर्ज मंजूरी प्रकरणे १९९६ पासून सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, संबंधित अधिका-याविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळातील सेवानिवृत्त मृत शिक्षकांच्या नावे बोगस / कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामधुन रुपये ९,०८,८७२ /- रकमेचा अपहार झाल्याची बाब महानगरपालिका प्रशासनाच्या सन १९९६ मध्ये निदर्शनास आली आहे.
(२) होय.
(३) या प्रकरणी ठाणे महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे.
(४) (१) या प्रकरणी शिक्षण मंडळातील ५ कर्मचा-यांपैकी ४ कर्मचा-यांना निलंबित करण्यात येऊन ३ कर्मचा-यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली. दोन कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आली नाही.
(२) यामधील श्रीमती श्रध्दा गावस्कर, लिपिक यांना दिनांक ३०.०८.१९९६ पासून निलंबित करण्यात करुन येऊन त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. विभागीय चौकशीमध्ये त्या दोषी आढळून आल्याने त्यांना दिनांक १०.१०.२००३ पासून महानगरपालिकेच्या सेवेतून चौकशीअंती बडतर्फ करण्यात आले. तद्नंतर फौजदारी प्रकरणाच्या अनुषंगाने दिनांक २४.०६.२००२ च्या निर्णयान्वये मा.न्यायालयाने त्यांना निर्दोष सोडल्याने त्यांना दिनांक ०४.०२.२०१० पासून महानगरपालिकेच्या सेवेत घेण्यात आले आहे.
(३) तसेच सन २००६ मध्ये श्री. येंदे, श्री.जोशी, श्री. उतेकर, श्री.गोळे यांचेविरुध्दही गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. श्री. अशोक उतेकर व श्री.अशोक गोळे यांच्याविरुध्दच्या विभागीय चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याची तजविज महानगरपालिकेने ठेवली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### कर्जत - खालापूर तालुक्यात (जि. रायगड) एमएमआरडीएकडून करण्यात आलेल्या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(६७) * ८०४० श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत - खालापूर तालुक्यात (जि. रायगड) एमएमआरडीएकडून रस्त्यांची निकृष्ट दर्जाची कामे चालू आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामीण भागात काही कामे चालू असून अर्धवट अवस्थेत असल्याने नागरिकांचे प्रचंड प्रमाणात हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) मुख्यतः भूसंपादन करणे व सेवावाहिन्या स्थलांतर करण्यास संबंधित यंत्रणेकडून लागलेला वेळ या कारणांमुळे रस्त्याची कामे निर्धारीत कालावधीत पुर्ण करणे शक्य झाले नाही. तथापि, उपलब्ध झालेल्या जागेतील रस्त्यांची कामे सद्यस्थितीत अंतिम टप्प्यात असून मार्च, २०१५ अखेर पुर्ण होणे अपेक्षित आहे.

-----------------

### मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत

**(६८) * ८२१५ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (चिमूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलुस-कडेगाव), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.रमेश लटके (अंधेरी (पूर्व)) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, पनवेल व कर्जत येथे म्हाडामार्फत बांधण्यात येणा-या ४१४८२ घरांपैकी ५० टक्के घरे गिरणी कमगारांना देण्याचा निर्णय घेऊन त्याबाबत शासननिर्णय दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४ रोजी काढूनही गिरणी कामगारांना अद्याप घरे देण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) तसेच सर्व गिरणी कामगारांचे मुंबईत घरे देवून पुनर्वसन करणे शक्य नाही म्हणून

शासनाने दिनांक २० फेब्रुवारी, २०१४ रोजी अध्यादेश काढून एमएमआरडीएची ५० टक्के घरे देण्याचे मान्य केले होते परंतू संबंधित विभागाने ठोस निर्णय न घेतल्याने एकही गिरणी कामगाराला मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) व (३) मुंबई महानगर प्रादेशिक योजना क्षेत्रामध्ये भाडेतत्वावरील घरे योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या एकुण सदनिकांपैकी ५० % पर्यंत सदनिका गिरणी कामगार व इतर तत्सम वर्गवारीच्या गरजू व्यक्तिंना परवडणारी घरे म्हणून मालकी तत्वावर वाटपासाठी राखून ठेवण्याअनुषंगाने शासनाने भाडेतत्वावरील घरे योजनेच्या नियमावलीमध्ये दि.२१/२/२०१४ च्या अधिसूचनेद्वारे फेरबदल केला आहे. तसेच शासनाने दिनांक ४/३/२०१४ च्या पत्रान्वये ४ बांधकाम प्रकल्पांमध्ये भाडे तत्वावरील घरे योजनेंतर्गत प्राप्त होणा-या १६० चौ.फूटाच्या २ सदनिकांचे एकत्रिकरण करुन ३२० चौ.फूटाच्या सदनिका तयार करण्यास व सदर सदनिका गिरणी कामगारांना शासन स्वतंत्रपणे ठरवेल त्या किंमतीवर व अटी /शर्तीवर मालकी तत्वावर देण्यासाठी राखून ठेवणेबाबत प्राधिकरणास कळविले आहे. प्रादेशिक योजना क्षेत्रामधील भाडेतत्वावरील घरे योजनेअंतर्गतचे प्रकल्प बांधकामाच्या विविध टप्प्यावर असून, या योजनेअंतर्गत प्राधिकरणास अद्याप सदनिका प्राप्त झालेल्या नाहीत. सदर प्रकल्पाचे काम पुर्ण झालेनंतर सदनिका उपलब्ध होणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी शहरालगतच्या साळवी स्टॉप येथे नगरपरिषदेच्या डंम्पींग ग्राउंडमुळे नागरिकांना होणारा त्रास

**(६९) * ९३८१ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी शहरालगतच्या साळवी स्टॉप येथे नगरपरिषदेचे डंम्पींग ग्राउंड असून त्याच डंम्पींग ग्राऊंडच्या शेजारील रनपचा जलशुध्दीकरण प्रकल्प असून या प्रकल्पामधून पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर डंम्पींग ग्राऊंडमुळे या परिसरामधील रहिवाशी दुर्गंधीयुक्त वातावरणात जीवन जगणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) अंशतः हे खरे आहे.

तथापि घनकचरा प्रकल्पासाठी जागा अस्तित्वात नसल्याने नाईलाजाने रत्नागिरी शहरातील घनकचरा, साळवी स्टॉप येथे असणा-या जलशुध्दीकरण केंद्राजवळील मोकळ्या जागेत चिरेखाणीमध्ये भूमीभराव करण्याकामी टाकण्यात येतो. या कच-यापासून दुर्गंधी येऊ नये म्हणून विविध जंतूनाशक पावडर व त्याचे विघटन त्वरीत व्हावे याकरिता कच-यावर पावडर टाकण्यात येते व माती टाकून कंपोस्टींग करण्यात येते. त्यामुळे नागरिकांचे आरोग्यास धोका उत्पन्न होत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे येथील जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण योजना बंद करून त्याऐवजी स्मार्ट सिटी प्रकल्प कार्यान्वित होणार असल्याबाबत**

**(७०) * ५२७५ श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (चिमूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण योजना (जेएनएनयुआरएम) बंद करून त्याऐवजी स्मार्ट सिटी प्रकल्प कार्यान्वित होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील स्मार्ट सिटी प्रकल्पामुळे शहरातील भामा आसखेड योजना आणि वडगाव बुद्रुक येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या कामास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे शहरात जेएनएनयुआरएम प्रकल्प बंद करुन त्याऐवजी स्मार्ट सिटी प्रकल्प राबविण्याबाबत केंद्र शासनाकडून कोणत्याही सूचना प्राप्त झालेल्या नाहीत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही. जेएनएनयुआरएम योजनेच्या वाढीव कालावधी अंतर्गत सन २०१३-१४ मध्ये भामा आसखेड पाणी पुरवठा योजना व वडगाव बुद्रुक जलशुध्दीकरण केंद्र उभारणेसाठी प्रकल्प मंजूर झालेला असून केंद्र शासनाकडून रु. ६२२७.९८ लाख व राज्य शासनाकडून रु. २४९१.१९ लाख असे एकूण रुपये ८७१९.१७ लाख निधी आतापर्यंत पुणे महानगरपालिकेस वितरीत करण्यात आला आहे. जेएनएनयुआरएम (ट्रांझिशन फेज) योजनेचा वाढीव कालावधी हा मार्च २०१७ पर्यंत असून त्या अनुषंगाने केंद्र शासनाचा हिश्याचा उर्वरीत निधी अनुज्ञेय असणार असून दोन्ही प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर आहे.

**ठाणे शहरातील कोलशेत भागात वाघवा ग्रुप कन्स्ट्रक्शनच्या मजूराचा झालेला मृत्यु**

**(७१) * ७३६२ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील कोलशेत भागात वाघवा ग्रुप कन्स्ट्रक्शनच्या एव्हरेस्ट इमारतीचे बांधकाम सुरु असतांना दिनांक ५/१/२०१५ रोजी वा त्या सुमारास माल वाहून नेणारी ट्रॉली कोसळून झालेल्या अपघातात एका कामगारांचा जागीच मृत्यू झाला व पाच जण जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या घटनेत मृत्यू पावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना व जखमींना कोणत्या प्रकारची आर्थिक मदत वा नुकसान भरपाई दिली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) ठाणे शहरातील विजय असोसिएटस (वाधवा ग्रुप) प्लॉट नं.अे ॲण्ड एफ. बायर इंडिया कंपनी समोर, कोलशेत रोड, कापूरबावडी, ठाणे पश्चिम येथे सुरू असलेल्या इमारत बांधकामाच्या कामाकरिता टॉवर क्रेन उभारण्याचे काम मे.लक्ष्मी इंजिनियर्स या कंत्राटदारामार्फत सुरू होते. दि.०५/०१/२०१५ रोजी सदरहू क्रेन उभारणीचे काम सुरू असताना झालेल्या अपघातात एका कामगाराचा मृत्यू झाला व ५ जण जखमी झाले, हे खरे आहे.

(२) कामगार आयुक्त तथा महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम, मुंबई कार्यालयाच्या अंमलबजावणी यंत्रणेमार्फत भेट देऊन कामगार अधिनियमांतर्गत निरीक्षण शेरे नोंदविण्यात आले आहेत.

(३) मृत कामगारांच्या नातेवाईकांकडे रू.२ लाख एवढी रक्कम मदत म्हणून सुपूर्द करण्यात आली असून जखमी कामगारांच्या औषधोपचाराचा खर्च (रू.१५,२१,७८१/-) मे.लक्ष्मी इंजिनियर्स या कंत्राटदारातर्फे करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महापालिका क्षेत्रात बीएसयुपी योजना राबविण्याबाबत

**(७२) * ७००५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका क्षेत्रात बीएसयुपी योजना राबविण्यासंदर्भात प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे ११९६ सदनिका व २९३ संक्रमण घरे रद्द करावी लागलेली असून केंद्र शासनाला सुमारे २० कोटी रुपये परत करावे लागणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय,

(३) असल्यास, महापालिका क्षेत्रातील गोरगरिब झोपडीधारकांना पक्की घरे उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासन कोणती उपाययोजना करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अंशतः खरे आहे. ठाणे महानगरपालिकेस '' शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरिवणे'' या केंद्र सहाय्यित उपअभियानातील मंजूर ४ प्रकल्पांमध्ये मान्य झोपडपट्टी क्षेत्रातील झोपडीधारकांचा विरोध, संक्रमण शिबिरांची कमतरता, जमिनीची अनुपलब्धता, योजनेसंदर्भातील न्यायालयीन दावे, योजनेच्या संपत आलेला कालावधी पाहता सुरु न झालेली घरकुले रद्द करण्याची घेतलेली भूमिका, इत्यादी कारणांमुळे केंद्र शासनाने मंजूर केलेल्या एकूण ७७४५ घरकुले व ४७८ संक्रमण शिबिरांपैकी ११९६ सदनिका व २९३ संक्रमण शिबिरे ठाणे महानगरपालिकेद्वारे रद्द करण्याबाबत प्रस्तावित केले आहे. प्रकल्प सिमित करण्यात आल्याने केंद्र व राज्य शासनाचा देय हिस्सा कमी झाला आहे. त्या अनुषंगाने रुपये १५.०९३ कोटी व त्यावरील व्याज राज्य शासनाकडे परत करणे क्रमप्राप्त आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) केंद्र शासनाने ''२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे'' हे धोरण घोषित केले असून या बाबतची मार्गदर्शक तत्वे केंद्र शासनाकडून प्राप्त होणे अपेक्षित आहे. त्यात झोपडपट्टी विकासही अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट येथील महापालिकेच्या (पे ॲण्ड पार्क) पार्किंग कंत्राटदार जादा दराने आकारणी करित असल्याबाबत

**(७३)** * **८४०४** **श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट येथील महापालिकेच्या (पे ॲण्ड पार्क) पार्किंग करावयाच्या जागेमध्ये खाजगी कंत्राटदार नेमून दिलेल्या दरापेक्षा पंधरापट जास्त दर आकारित येत असल्याबाबत माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईमध्ये अशाच प्रकारे महापालिकेच्या अधिकृत (पे ॲण्ड पार्क) पार्किंगच्या जागेवर खाजगी कंत्राटदार नेमून दिलेल्या दरापेक्षा जास्त दर आकारला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महापालिकेने नेमुन दिलेल्या दरापेक्षा जास्त दर आकारणा-या कंत्राटदारावर मुंबई महापालिकेमार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मुंबई महापालिकेच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या प्रचलित धोरणानुसार वाहनतळ योजनेच्या दरानुसार निविदा मागवून खाजगी कंत्राटदारांची नेमणुक केली आहे. महात्मा जोतिबा फुले मार्केट जवळील वाहतुक बेटामध्ये पे अँड पार्क योजनेकरिता मे.राज इंटरप्रायजेस यांची ६ महिन्यांच्या कालावधीसाठी नेमणुक करण्यात आली. १ जानेवारी, २०१५ रोजी वर्तमानपत्रामध्ये मे.राज इंटरप्रायजेस यांच्या कर्मचा-यांविरुध्द पार्किंगकरिता जास्त दर आकरण्या संबंधीत तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली होती.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "ए" विभागामध्ये ईरॉस सिनेमा समोरच्या वाहतुक बेटामधील पे अँड पार्क जागेवर नेमुन दिलेल्या दरापेक्षा जास्त दर आकारण्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. तथापि, सदर तक्रार वगळता मुंबईमधील अन्य ठिकाणी महापालिकेच्या अधिकृत (पे आणि पार्क) पार्किंगच्या जागेवर खाजगी कंत्राटदार नेमून दिलेल्या दरापेक्षा जास्त दर आकारत असल्याबाबतच्या कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) मे. राज इंटरप्रायजेस (महात्मा जोतिबा फुले मार्केट जवळील वाहतुक बेटामधील पे अँड पार्क योजना) व मे. प्राइम टोल अँड मेटल रिकव्हरिज प्रा.लि. (ईरॉस सिनेमा समोरच्या वाहतुक बेटामधील पे अँड पार्क योजना) या दोन कंत्राटदारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेने कारखे दाखवा नोटीस जारी केली असून निविदेतील दंड आकारण्यात आला आहे.

महात्मा ज्योतिबा फुले मार्केटजवळील वाहतुक बेटामधील पे अँड पार्क जागेमधील जास्त दर आकाराणारा इसम श्री. युसुफ शेख यांच्याविरुध्द आझाद मैदान पोलीस ठाण्यामार्फत प्राथमिक चौकशी अहवालाची नोंद घेतली असुन तक्रार दाखल झालेली आहे. आझाद मैदान पोलीस ठाण्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई येथील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीबाबत**

**(७४) * ५८९१ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्ती निधी अभावी रखडली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या १५६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अंशतः खरे आहे.

(२) सन २०१४-१५ च्या अर्थसंल्पामध्ये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्तीकरीता शासकीय अंशदानापोटी रु. ३८ कोटी व उपकराच्या वसुलीची

रक्कम देण्याकरीता रु. ५० कोटींची तरतुद करण्यात आली असून त्या रक्कमेपैकी ८५ टक्के रक्कम मंडळास वितरीत करण्यात आली आहे. तर उर्वरीत रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. अशंदानापोटी थकीत रु. १००.३१ कोटी व उपकराच्या वसुलीच्या देय रकमेपोटी थकीत रु. ५६.३६ कोटींच्या वितरणापोटी पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

-----------------

**पुणे शहरातील मेट्रोचा मार्ग आखणीमध्ये बदल करण्याची आवश्यकता**

**(७५) * ८२४४ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील मेट्रो मार्गाच्या आखणीमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्याचा अहवाल मेट्रोच्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांनी पुणे महानगरपालिकेला सादर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवाल पुणे महानगरपालिका प्रशासनाने सहा महिने प्रलंबित ठेवून पहिलाच प्रस्ताव पुढे सादर करण्यात आल्याची बाब माहे दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पुणे मेट्रो प्रकल्पास राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच केंद्र शासनाने देखील सदर प्रकल्पाला तत्वतः मान्यता दिलेली आहे. मेट्रोच्या विशेष कार्याधिकारी यांनी त्यांच्या कार्यकालावधी समाप्तीनंतर पुढील अधिका-यांसाठी मार्गदर्शन व्हावे म्हणून दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजी पुणे महापालिका आयुक्त यांना सादर केलेल्या कार्यभार हस्तांतरण टिप्पणीमध्ये सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) हा सन २००९ मध्ये तयार करण्यात आलेला आहे तथापि, अलाईनमेन्टच्या जागेवर काही बदल झालेले असल्याने भविष्यात अलाईनमेन्टमध्ये उद्भवणा-या अडचणींवरील निरिक्षणे नोंदविली आहेत. सदर निरीक्षणांची कार्यवाही, प्रकल्पास केंद्र शानाच्या मंजूरी मिळाल्यानंतर अंतरिम सल्लागाराची नेमणूक केल्यानंतर सदर मार्गिकेचे अंतिम refinement चे वेळेस करण्याबाबतचा त्यामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे. विशेष कार्याधिकारी यांनी कार्यभार हस्तांतरण टिप्पणी सादर करणे पूर्वीच मेट्रो प्रकल्पाचा मूळ प्रस्ताव हा राज्यशासनामार्फत केंद्र शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**विलेपार्ले पूर्व, मुंबई येथील उद्यानासाठी राखीव असणाऱ्या भूखंडावरील अतिक्रमण**

**(७६) * ७५६२ श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथील नगर योजना V अंतरीत उद्यानासाठी राखीव असलेल्या अंतिम भूखंड क्रमांक १८६ या भूखंडावर मार्बल व्यापाऱ्यांचे अतिक्रमण झाले असून सदरच्या भूखंडाच्या जेमतेम एक तृतीयांश भागावर उद्यान बनवले असून उर्वरित दोन तृतीयांश भागावर अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमणांना केवळ नोटीस देण्याची कारवाई केली अनधिकृत गाळेधारकांनी पुरावा म्हणून फोटोपास जोडले, फोटोपास सत्यतेबाबत अतिरिक्त जिल्हाधिकारी, अतिक्रमण निष्कासन, मुंबई यांच्याकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) विलेपार्ले (पूर्व) येथील मुळ भूखंड क्र. 342 अंतिम भूखंड क्रमांक 186 नगर रचना क्रमांक 5 हा उद्यानासाठी राखीव म्हणून घोषित करण्यात आला असून मूळ भूखंड क्र. 342 वर काही गाळे अस्तित्वात असलेल्या मोकळ्या जागेवरती बृहन्मुंबई महानगरपालिकेने उद्यान विकसित केले असून उर्वरीत उद्यानासाठी राखीव असलेल्या भागावरील अतिक्रमण निष्कासीत करण्याची कारवाई सुरु करण्यात आली.

(2) अनधिकृत गाळेधारकांनी पुरावा म्हणून सादर केलेले फोटोपास बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण निष्कासन), मुंबई यांच्याकडे पात्र पडताळणीसाठी पाठविण्यात आले असता, नियंत्रक (अतिक्रमण निष्कासन), बृहन्मुंबई यांनी गृहनिर्माण विभागाच्या दिनांक 15.08.2000 च्या शासन निर्णयान्वये झोपडी गणना मोहिम 1976, 1980 व 1990 अंतर्गत देण्यात आलेली सर्व झोपडी ओळखपत्र रद्द करण्यात आले असल्याचे आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविले आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मॉडल हाऊस अंधेरी (प.) परिसरातील तिवरांची अवैध कत्तल

**(७७) * ८३७९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी पश्चिमेला मॉडेल टाऊन या वसाहतीमागे तिवरांची कत्तल करुन खाडीत अंदाजे तीन हजार झोपड्या बांधल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टीत जास्तीत जास्त बांगलादेशीयांचे वास्तव्यास आहेत, हे ही खरे आहे

काय,

(३) असल्यास, स्थानिक नागरिकांनी या बाबतच्या तक्रारी वारंवार केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शासनाने संबंधित अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**रत्नागिरी येथे १८० वर्षापूर्वीच्या पोर्तुगीजकालीन जिल्हा विशेष कारागृहाची तटबंदी व आतील काही भाग मोडकळीस आल्याबाबत**

**(७८) * ६१७७ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथे १८० वर्षापूर्वीच्या पोर्तुगीजकालीन जिल्हा विशेष कारागृहाची तटबंदी व आतील काही भाग मोडकळीस आला असून दोन आरोपींनी त्यावरुन पलायन करण्याचा प्रयत्न केला होता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास , नवीन कारागृहास मंजूरी मिळावी याकरीता सन २०११ मध्ये तत्कालीन कारागृह अधिक्षकांनी शासनाला प्रस्ताव सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदर प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुलाबा येथील राजवाडकर स्ट्रिट परिसरात ६१ व ६३ क्रमांकाच्या इमारतींच्या अवैध बांधकाम**

**(७९) * ८४५५ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.राज के पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा येथील राजवाडकर स्ट्रिट परिसरात ६१ व ६३ क्रमांकाची तळ व पहिला मजले

असलेल्या दोन इमारती असून या इमारतींमध्ये बारा रहिवाशी पगडी पध्दतीने राहतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या टॉयलेट ब्लॉक दुरुस्तीच्या कामाची मंजूरी घेतली होती, मात्र प्रत्यक्षात दुरुस्ती न करता दोन्ही इमारती जमीनदोस्त करुन त्या ठिकाणी चार मजली नवीन इमारतीचे बांधकाम करुन म्हाडा, महानगरपालिका व शासनाची फसवणूक करण्याचा धक्कादायक प्रकार दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची म्हाडाकडून करण्यात आलेल्या चौकशीत संबंधित इमारतीच्या मालकांनी काही अधिकाऱ्यांनी संगनमत करुन बोगस कागदपत्रे सादर करुन तिथे चार मजली असल्याचे तसेच इमारतीमध्ये २४ भाडेकरु राहत असल्याचे कागदपत्रे सादर केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाची फसवणूक करणाऱ्या इमारतीचे मालक व संबंधित विभागातील अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) कुलाबा येथील राजवाडकर स्ट्रिट परिसरात ६१-६३ क्रमांकाची एकच इमारत असून या इमारतीमध्ये घरमालकासह बारा भाडेकरु रहिवाशी रहात होते.

(२) सदर इमारतीच्या शौचालयाच्या दुरुस्तीसाठी अंदाजपत्रक व नकाशे यांना मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाद्वारे मंजूरी देण्यात आली होती. परंतु ठेकेदाराने सदर इमारत पाडून तळ मजला अधिक चार मजल्याची इमारत बांधत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे ठेकेदारास दि. १०.१२.२०१४ रोजी काम थांबविण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेस सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (एमआरटीपी अॅक्ट) अंतर्गत कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) सदर प्रकरणाची म्हाडाकडून करण्यात आलेल्या चौकशीत संबंधित इमारतीच्या मालकांनी तसेच सदर ठेकेदार व वास्तुविशारद यांनी संगनमत करुन बोगस कागदपत्रे सादर करुन तिथे चार मजली इमारत असल्याचे भासविले आहे.

(४) सदर ठेकेदार व वास्तुविशारद यांचेविरुध्द कुलाबा पोलीस ठाण्यामध्ये प्रथम पाहणी अहवाल गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस विभागामार्फत चौकशी सुरु आहे. तसेच कर्तव्यात कसूर केल्याबद्दल संबंधीत अधिका-यांकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या कारभारात अनियमितता व गैरप्रकार असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून उघडकीस आल्याबाबत

**(८०) * ५९४१ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड (पूर्व)), श्री.अमिन**

**पटेल (मुंबादेवी), ॲड यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दूल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या कारभारात प्रचंड अनियमितता व गैरप्रकार असल्याचे गंभीर प्रकार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रमुखांनी माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आणले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचार रोखला तर या शहरातील घरे प्रति चौ.फुट पाचशे रुपयांनी स्वस्त होणार असल्याचे निदर्शनास आले , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महापालिकेतील भ्रष्टाचाराची न्यायालयीन चौकशी करण्याची विविध राजकीय पक्षांनी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**माण तालुक्यातील (जि.सातारा) बोथे येथील पवनचक्की कंपनीच्या गोदामातील जिलेटिनचा स्फोट होऊन तीन कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(८१) * ८०७५ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दूल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष पाटील (अलिबाग), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधुत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण तालुक्यातील (जि.सातारा) बोथे येथील पवनचक्की कंपनीच्या गोदामातील जिलेटिनचा दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास स्फोट होऊन त्यामध्ये तीन कामगारांचा जागीच मृत्यू होऊन एक कामगार जखमी झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने कोणती चौकशी केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू स्फोटामध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना व जखमी झालेल्या कामगारांना कोणत्या स्वरूपाची आर्थिक मदत देण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**वाळकेश्वर, मुंबई येथील २२० जेकिसन निवास हा दोन मजल्याचा बंगला पाडून बेकायदेशीर पणे तेथे गगनचुंबी इमारत उभारण्यात येत असल्याबाबत**

**(८२) * ८५६६ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळकेश्वर, मुंबई येथील २२० जेकिसन निवास हा दोन मजल्याचा बंगला पाडून तेथे गगनचुंबी इमारत स्काय स्क्रॅपर उभारण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नऊ भाडेकरू असलेल्या बंगल्यात ४८ भाडेकरू दाखवून ३३ मजल्याची इमारत उभारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, शासनामार्फत दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, भाडेकरू वाढवून सदर इमारतीस मंजुरी देणाऱ्या व्यक्तींवर शासनाद्वारे काय कारवाई करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) वाळकेश्वर, मुंबई येथील २२० जेकिसन निवास हा तळमजला + एक + दोन मजला (अशंत) स्वरुपाचा होता. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दि. १४.१.२००० रोजीच्या मंजूर आराखड्याप्रमाणे तळघर + खालील तळमजला + वरील मजला (मंदिरा सहित) + स्टिल्ट मजला + पहिला मजला ते ३२ निवासी मजले अशा प्रकारची निवासी इमारत बांधण्यात आलेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दि. २२.१०.२०१० रोजीच्या पत्रान्वये सदर इमारतीच्या ४ ते ३२ मजल्यांना भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले आहे.
(२) विकासकास सुरवातीस ४८ भाडेकरु / रहिवाशी ग्राह्य धरुन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. परंतु चौकशी अंती ९ भाडेकरुंची संख्या अंतिम करण्यात आली व मंजूर चटई क्षेत्र निर्देशांक २ नुसार मुंबई बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मान्यता देण्यात आली.

४८ भाडेकरु ग्राह्य धरल्यास अनुज्ञेय अतिरिक्त क्षेत्रफळ २८२.०५ चौ.मी. येत होते. परंतु ९ भाडेकरु ग्राह्य धरल्यानंतर ७७१.४४ चौ.मी. अतिरिक्त क्षेत्रफळ एवढे अनुज्ञेय झाले व याबाबत शासन स्तरावर निर्णय होवून सदरच्या अनुज्ञेय क्षेत्रफळाबाबत सन २००९ च्या शीघ्र गणकानुसार रु. १८.६९ कोटी एवढी रक्कम विकासकाने म्हाडास जमा करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे विकासकास कोणताही अतिरिक्त फायदा झालेला दिसत नाही.
(३) होय. सदर प्रकरणी मुख्य दक्षता अधिकारी व सुरक्षा अधिकारी, म्हाडा यांचेमार्फत सखोल चौकशी करण्यात आली होती.
(४) व (५) याप्रकरणी चौकशी करण्यात आली असून, जबाबदार म्हाडाच्या संबंधित उप अभियंता श्री.झेड.यू. जयफुल्लाह यांची चौकशी झाली असून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील ३(१) एक या नियमाचा भंग केल्यामुळे त्यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी सेवा संपेपर्यंत रोखून ठेवण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई विमानतळासाठी जमीन संपादित केलेल्या गावांकरिता**
**शासनाने पॅकेज जाहीर केल्याबाबत**

**(८३) * ७७२६ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विमानतळासाठी ज्या गावांच्या जमीन शासनाने संपादित केल्या आहे, त्या गावांकरिता शासनाने पॅकेज जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पॅकेजमध्ये एका व्यक्तीने स्वतःच्या जमिनीत एकापेक्षा जास्त घरे बांधली असतील, त्या घर मालकांना तीनपट जमीन न देणे, घरांच्या बांधकामासाठी १००० रूपये चौ.फुट खर्च, दिलेल्या जमिनीचा एफएसआय १.५ देण्यात आला आहे, प्रकल्पग्रस्तांना या बाबी मान्य नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) प्रकल्पग्रस्तांच्या पूनर्वसनाबाबत शासनाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामांसाठी तसेच, नवी मुंबई प्रकल्पासाठी भविष्यात संपादन करण्यात येणा-या जमीनीच्या भूधारकांसाठी भूसंपादनापोटी देय मोबदल्याबाबत आणि त्यानुषंगिक पुनर्वसन विषयक लाभासंदर्भातील धोरण अनुक्रमे शासन निर्णय दि. १ मार्च, २०१४ व २८ मे, २०१४ अन्वये निश्चित करण्यात आले आहे.

-----------------

**मुंबईत एसआरए योजनेच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी स्वतंत्र विकास**
**नियमावली असताना होत असलेल्या अनियमितता**

**(८४) * ६०९७ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अवधुत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हनुमंत डोळस**

**(माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत एसआरए योजनेच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी स्वतंत्रपणे विकास नियमावली असतांना अनेक विकासकांनी नियमावलीस बगल देवून इमारत बांधकामात अनियमितता केल्याबाबत एसआरए प्राधिकरणाने काही विकासकांना नोटीसा पाठविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय.

(२) यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पोलिसांच्या घरासाठी आरक्षित असलेला भूखंड विकासकास दिल्याबाबत

**(८५) * ७४९१ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत पोलिसांच्या घरासाठी ताडदेव येथील राखीव असलेला २ एकरचा मोकळा भूखंड एस.डी.कॉर्पोरेशनला झोपडपट्टी पुनवर्सन योजना राबविण्यासाठी दिला असून या बदल्यात पोलिसांना फक्त साठ घरेच मिळणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांच्या घरासाठी राखीव असलेला हा मोकळा भूखंड एस.डी. कॉर्पोरेशन ला देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या भूखंडाच्या बदल्यात पोलिसांना अधिक घरे मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) ताडदेव येथील भूकर क्र. ७२५ (भाग) या शासकीय मालकीच्या ३७०६१.८० चौ.मी. क्षेत्रफळ झोपडपट्टी व्याप्त भूखंडावर नव महाराष्ट्र नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना सुरु असून त्या जमिनीवर पोलीस हौसिंगसाठी विकास नियोजन आराखड्यातील ९१०० चौ.मी. चे आरक्षण आहे.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१, ३३(१०) परिशिष्ट -४ कलम ७.५ नुसार आरक्षणाच्या २५ % क्षेत्र (३०२५.२५ चौ.मी.) पोलीस हौसिंगसाठी उपलब्ध होत असून त्यामध्ये पोलीस हौसिंगसाठी स्वतंत्र इमारतीमध्ये ४१.८८ चौ.मी. चटई क्षेत्रफळाच्या ६२ सदनिका पोलीस

विभागाच्या मान्यते सापेक्ष प्रस्तावित आहेत.

(२) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१, ३३(१०) परिशिष्ट-४ कलम ७.१ च्या तरतुदीनुसार विकास नियोजनातील विविध आरक्षणे / प्रभागाने बाधीत जमिनीवर झोपडपट्टी वसलेली असेल तर शासन अधिसूचना दिनांक ३ जून, १९९२ च्या तरतूदीनुसार त्या जमिनीवर विकास करण्यास अनुज्ञेय आहे.

(३) प्रश्न भाग-१ च्या उत्तरामध्ये नमूद केल्याप्रमाणे बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या तरतूदीनुसार अनुज्ञेय असल्याप्रमाणे, तेवढ्या क्षेत्रफळाचे बांधकाम विकासकाकडून पोलीस विभागाला मोफत करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

(४) पोलीस विभागाने पोलीस हौसिंगच्या इमारतीचे आराखडे मंजूर करावेत या संदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

**कोल्हापूर जिल्हयात उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करणेबाबत**

**(८६) * ७२२९ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.शंभुराज देसाई (पाटण), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या पाच जिल्हयातील उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यांची संख्या सातत्याने वाढत असल्याने उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे निर्माण करण्याच्या मागणीसाठी दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी येथील वकिलांनी कोल्हापूर जिल्हा न्यायालयात आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नवीन खंडपीठासाठी विविध स्तरातून होणा-या मागणीस अनुसरुन ती तपासून अहवाल सादर करण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या मा.मुख्य न्यायमूर्तींनी तीन न्यायमूर्तीची समिती गठीत केली आहे. सदरहू मागणी या समितीच्या विचाराधीन आहे. त्याचप्रमाणे मा.मुख्य न्यायमूर्तींनी त्यांच्या दि. ११/०८/२०१४ च्या मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित केलेल्या पत्रान्वये अशी विनंती केली आहे की, मुंबई उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ राज्यात केवळ कोल्हापूर येथे स्थापन करणे वाजवी होईल किंवा कसे, याबाबत शासनाचे मत उच्च न्यायालयास कळविण्यात यावे. त्यानुसार यासंदर्भात शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करमाळा (जि.सोलापूर) शहरात मराठा, मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन या समाजबांधवाना स्वतंत्र स्मशानभूमीबाबत**

**(८७) * ९९७५ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) शहरात मराठा, मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन या समाजबांधवाना स्वतंत्र स्मशानभूमी असून मात्र वीरशैव लिंगायत समाजास स्मशानभूमीच नसल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानूरकर मठाने त्यांना अंत्यसंस्कार करु न दिल्यास त्यांचा अंत्यविधीचा गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी सातनळ विहिर परिसरात ५ एकरची जागा उपलब्ध करुन देण्यासाठी नगरपरिषदेत पाच वर्षापूर्वी ठराव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीरशैव लिंगायत समाजासाठी स्मशानभूमीकरीता जागा देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्रीवर्धन (जि.रायगड) येथील गोठणमधील सेंद्रिय खत निर्मिती प्रकल्प नादुरुस्त झाल्याबाबत**

**(८८) * ७९६६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) येथील गोठणमध्ये मार्च, २०१४ मध्ये घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत मिश्र कचऱ्यावर शारगोतक व जैविक पध्दतीने यंत्राव्दारे सेंद्रिय खत निर्मिती प्रकल्प नऊ महिन्यातच नादुरुस्त झाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोळा केलेला कचरा एकत्रित करुन वाळवटी येथील गोठण येथे घेऊन जाण्यासाठी ६७ लाखाचा निधी शासनाकडून मंजूर करुन नवीन शेड व नवीन घनकचरा प्रकल्पासाठी यंत्रसामुग्री घेण्याचा ठेका पार्श्व इन्व्हयरे टेक्सीस पुणे या कंपनीला देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कंपनीने बसविलेल्या मशिनरीचे वायर तुटलेले, नंबर प्लेटना लावलेला हातीरंग अशा यंत्रसामुग्री केवळ १० महिन्याच्या आतच नादुरुस्त अवस्थेत पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पाहणी करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) मे.पार्श्व इन्व्हायरे टेक्नीस प्रा.लि. या कंपनीला ठेका दिला असून या प्रकल्पास रु. ६१.७० लाख निधी मंजूर आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकल्प होवू नये म्हणून मा.न्यायालय श्रीवर्धन येथे दावा क्र. २१ /२०१३ दाखल होता. या दाव्याचा निकाल दि. १८/११/२०१४ रोजी नगरपालिकेच्या बाजूने लागल्यानंतर ठेकेदाराने काम सुरु केले व दिनांक ७/१/२०१५ रोजी चाचणी घेवून प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आला आहे.

-----------------

**भांडूप-पश्चिम (मुंबई उपनगर) परिसरातील शिवाजीनगरमध्ये असलेले महानगरपालिकेचे रुग्णालयाबाबत**

**(८९) * ५५६७ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप-पश्चिम (मुंबई उपनगर) परिसरातील शिवाजीनगरमध्ये असलेले महानगरपालिकेचे रुग्णालय जून,२०१३ मध्ये इमारत धोकादायक असल्याचे कारण देत शिवाजी तलाव परिसरात हलविण्यात आले असून मात्र सध्या सुशोभिकरणाच्या कारणावरुन तेथूनही आता उत्कर्ष नगरातील गंगा विद्यालयात हलविण्यात आल्याने मागील दीड वर्षापासून रुग्णांचे हाल होत असल्याचे माहे जानेवारी,२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालय आता कुठेच नसून फक्त मुंबई महानगरपालिकेच्या कागदोपत्री असल्याने सदरहू परिसरातील नागरिक संतप्त झाले आहेत हे लक्षात घेता शासन काय कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) भांडूप (पश्चिम) येथील शिवाजीनगर या मुंबई उपनगर परिसरातील टेंबीपाडा महापालिका दवाखाना जून २०१३ मध्ये वास्तु धोकादायक झाल्यामुळे, मोठया स्वरुपाच्या दुरुस्त्यांसाठी तात्पुरत्या स्वरुपात शिवाजी तलाव परिसरात असलेल्या महानगरपालिका दवाखान्यात स्थलांतरीत करण्यात आला होता. त्यानंतर शिवाजी तलावाचे सुशोभिकरण करण्याचे ठरल्यामुळे तेथे हलविण्यात आलेला टेंबीपाडा दवाखाना उत्कर्ष नगरातील गंगा विद्यालयात मे, २०१४ रोजी हलविण्यात आला आहे. टेंबीपाडा व शिवाजी नगरलगतच्या परिसरातील रुग्णांसाठी १ कि.मी. अंतरावर गंगा विद्यालयातील मनपा दवाखाना १ कि.मी. अंतरावर तुलशेतपाडा महापालिका दवाखाना व २ $^{१/२}$ कि.मी. अंतरावर ईश्वरनगर मनपा दवाखाना वैद्यकीय सुविधांसाठी उपलब्ध आहे. त्यामुळे सदर रुग्णांची गैरसोय झाल्याचे आढळून आलेले नाही.

(२) टेंबीपाडा महापालिका दवाखाना धोकादायक असल्यामुळे जून २०१३ रोजी अंशतः निष्कासित करण्यात आला व दुरुस्तीच्या निविदेबाबतची प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई उपनगरात म्हाडाच्या मोकळया भूखंडावर म्हाडाने बांधकाम न केल्याबाबत**

**(९०) * ६०५१ श्री.अजित पवार (बारामती), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणा जगजितसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शरद सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरात म्हाडाच्या मोकळया भूखंडावर म्हाडाने बांधकाम न केल्यामुळे त्याठिकाणी अनधिकृत बांधकामे व झोपडपट्टयांनी अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,
(२) मुंबईतील पहाडी गोरेगाव येथे म्हाडाचा १० एकराचा भूखंड असून म्हाडाचे त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्याठिकाणी झोपडपट्टयांनी अतिक्रमण केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) मुंबईत व उपनगरात जागेचे भाव गगनाला भिडत असतांना म्हाडाचे मोकळे भूखंड ताब्यात घेतल्यास म्हाडाला नागरीकांसाठी स्वस्त दरात घरे उपलब्ध करुन देण्यात येतील, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मोकळे भूखंड त्वरीत ताब्यात घेवून त्यावर गृहसंकुले उभारण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अंशतः खरे आहे.

म्हाडाच्या मालकीची मोकळी जमीन ज्या ज्या ठिकाणी आहे. त्या जागेवर होणारे अतिक्रमण वेळोवेळी निष्कासित करण्यात येते व सदर भूखंडास सुरक्षिततेच्या दृष्टीने कुंपण घालण्यात येते व योजना राबविण्यात योग्य अशा मोकळ्या भूखंडांवर म्हाडाकडून गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात.
(२) हे खरे नाही. गोरेगाव (पश्चिम) येथील मौजे पहाडी सर्व्हे क्र.२९ (पै) न.भू.क्र. ५० (अ) या जमिनीच्या मालकी हक्काबाबत प्रश्न निर्माण होऊन सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले आहे व त्यामुळे म्हाडास गृहनिर्माण प्रकल्प योजना राबविता आलेली नाही. तथापि या मोकळ्या भूखंडावर होणारे अतिक्रमण वेळोवेळी निष्कासित करण्यात आले असून सदर भूखंडास अंशतः पत्र्याचे कुंपण घालण्यात आलेले आहे.
(३) व (४) म्हाडाच्या ताब्यात असलेल्या मोकळ्या भूखंडांवर नागरिकांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्याच्या योजना म्हाडाकडून वेळोवेळी राबविण्यात येतात. मात्र न्यायप्रविष्ठ प्रकरणामध्ये मा.न्यायालयाच्या निर्णयानंतर अशी कार्यवाही करणे शक्य असते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई येथील हिम्बज हॉलिडेज या कंपनीच्या इचलकरंजीतील (जि.कोल्हापूर) शाखेने विविध योजनाचे आमिष दाखवून गुंतवणुकदारांना फसविल्याबाबत**

**(९१) * ६३६५ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील हिम्बज हॉलिडेज या कंपनीच्या इचलकरंजीतील (जि.कोल्हापूर) शाखेने कमीत कमी तेरा दिवस व जास्तीत जास्त ४० दिवस पैसे गुंतविल्यास रक्कमेवर ४० टक्के बोनस, विविध योजनाचे आमिष दाखवून ४८५ गुंतवणुकदारांना सव्वा कोटी रूपयांना फसविल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फसवणूक झाल्याप्रकरणी इचलकरंजी येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुंतवणुकदारांनी तक्रार केली असता सदर पोलीस ठाण्यात तक्रार नोंद करून घेण्यास नकार दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) होय, प्रश्नात नमूद प्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाणे (इचलकरंजी) जि.कोल्हापूर येथे ४८५ गुंतवणूकदारांची रु.१,३०,३१,३४० रुपयांची फसवणूक केल्याबाबत गु.र.नं. २०४/२०१४ भा.द.वि.स. कलम ४२०, ४०६, ३४ सह महाराष्ट्र ठेवीदाराचा (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधीत संरक्षण अधिनियम सन १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी १७ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यत आला आहे.
२) हे खरे नाही उक्त नमूद केल्याप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
३) व ४) होय, दाखल गुन्ह्याच्या तपासात निष्पन्न १२ आरोपी हे मुंबई आर्थिक गुन्हे शाखा यांचेकडे दाखल गुन्हा २०/२०१४ मध्ये न्यायालयीन कोठडीत ऑर्थर रोड जेल व तळोजा जेल, नवी मुंबइ येथे होते, सदर आरोपींचा ताबा वारंटने ताब्यात घेवून दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी अटक केली. त्यांची पोलीस कोठडी घेवून तपास करण्यात आला असता त्यांचे नावे असलेली स्थावर व जंगम मालमत्ता मुंबइ आर्थिक गुन्हे शाखेने उक्त नमूद गुन्ह्यात संलग्न केलेली असल्याचे आढळून आले. सदर आरोपींचे कोल्हापूर जिल्ह्यातील बॅंक खाते गोठविण्याबाबत बॅंकेस पत्रव्यवहार करण्यात आला आहे. उर्वरित आरोपींना अटक करण्याची कार्यवाही चालू आहे. हिम्बल हॉलीडेज प्रा.लि. कंपनीचे आवश्यक कागदपत्रे व शिक्के जप्त केली आहेत, गुन्ह्याचा तपास चालू आहे.
५) विलंब झालेला नाही.

-----------------

**मुंबईतील म्हाडाच्या मास्टर लिस्टमधील घरांसाठी पुरावे सादर करताना अनेक बनावट मतदार असल्याबाबत**

**(९२) * ५८९३ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या मास्टर लिस्टमधील घरांसाठी पुरावे सादर करताना अनेकांनी बनावट मतदार यादीचा पुरावा सादर करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी बनावट पुरावे म्हाडाला सादर करणाऱ्यांवर व बनावट पुरावे देणाऱ्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय.

(२), (३) व (४) चे उत्तर

मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळाच्या सुनावणी दरम्यान काही अर्जदारांनी सादर केलेली कागदपत्रे संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले आहे. सखोल चौकशी करण्यासाठी एकूण ५१ प्रकरणे मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्राधिकरण यांच्याकडे पाठविण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्यांना बृहतसुचीवरुन गाळे वितरणासाठी अपात्र ठरवून प्रस्तुत प्रकरणी मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्राधिकरण यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित अर्जदाराविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

-----------------

**मुंबईतील संक्रमण शिबीरातील मूळ रहिवाश्यांच्या हक्काच्या घराबाबत**

**(९३) * ७५६६ श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील संक्रमण शिबीरातील मूळ रहिवाश्यांना घरे देण्यासाठी मास्टरलिस्ट तयार करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मास्टरलिस्ट अंतर्गत ८०० अर्जदार अपात्र झाले असून या अपात्र अर्जदारांमध्ये बोगस व्हेकेशन नोटीस तयार करून म्हाडाची घरे लाटण्याचा प्रयत्न दलालांच्या टोळींने करण्यात आल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर टोळींनी दिलेले मतदार ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड आणि वीज देयक इ. बनावट कागदपत्रे यांची तपासणी करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास,त्यानुसार बनावट घरे लाटणाऱ्यांवर शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) चे उत्तर

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सुनावणी दरम्यान काही अर्जदारांनी सादर केलेली कागदपत्रे संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले आहे. सखोल चौकशी करण्यासाठी एकूण ५१ प्रकरणे मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्राधिकरण यांच्याकडे पाठविण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्यांना बृहतसुचीवरुन गाळे वितरणासाठी अपात्र ठरवून प्रस्तुत प्रकरणी मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्राधिकरण यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित अर्जदाराविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

-----------------

**मुंबईतील पर्जन्य जलवाहिन्या सुधारण्यासाठी महापालिकेने सुरु केलेल्या महत्वकांक्षी ब्रिमस्टोवॅड प्रकल्पातील अनियमिततेवर कॅगने ताशेरे ओढल्याबाबत**

**(९४) * ८३८१ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.बसवराज पाटील (अवसा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुळ), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी (पूर्व)) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक २६ जुलै, २००५ च्या प्रलयकारी पावसानंतर मुंबईतील पर्जन्य जलवाहिन्या सुधारण्यासाठी महापालिकेने सुरु केलेल्या महत्वकांक्षी ब्रिमस्टोवॅड प्रकल्पातील अनियमिततेवर कॅगने ताशेरे ओढले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरळी येथील लव्हग्रोव्ह पंपिंग स्टेशनचे ८५ कोटी ६३ लाख रुपयांचे कंत्राट युनिटी कन्सोरशियम या कंत्राटदाराला माहे नोव्हेंबर, २००१ मध्ये देण्यात आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामांमध्ये कंत्राटदाराने फक्त खोदकाम सुरु केले असता त्यास रू. ५७ कोटी ३० लाख देयक अदा केले व पुढे ते काम अशक्य बनल्याने पालिकेची ही रक्कम विनाकारण कंत्राटदाराला दिल्याचे दिसून येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित दोन्ही कंत्राटदारांवर व अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. बिमस्टोवॅड प्रकल्पाबाबत कॅगने ताशेरे ओढल्याबाबतचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

(२) वरळी येथील लव्हग्रोव्ह पर्जन्य जल उदचन केंद्राच्या कामासाठी रु. ८९,६३,१५,६८४ /- चे कंत्राट मे.युनिटी एम.अण्ड पी.डब्लू पी.के. कन्सोर्शिअम या कंत्राटदाराला दिनांक २१.११.२००७ मध्ये देण्यात आले. परंतु काही कारणास्तव प्रकल्पाची जागा बदलावी लागली तद्नंतर दि. १३.०४.२०११ मध्ये नविन जागा उपलब्ध करुन देण्यात आल्याने कंत्राटात फेरफार करुन नविन कार्यादेश दिनांक २३.११.२०११ अन्वये ११६, ८५,३०,००० /- एवढ्या किंमतीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही. सदर कामाच्या प्रशासकीय इमारतीचे पाइल फाऊंडेशनचे काम करण्यात आले असून त्याकरिता कंत्राटदारास रु. ५७,२९,८७४ /- (सत्तावन लाख, एकोणतीस हजार, आठशे चौ-याहत्तर रुपये ) इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. सदर पाइलींगच्या कामाचा उपयोग भविष्यात करता येऊ शकेल. तसेच सदर कंत्राट हे समाविष्ट कामे (टर्नकी) तत्वावर आधारीत असून सुधारीत कार्यादेश काढतांना सदर रक्कम रु. ५७,२९,८७४ /- वजा करण्यात आलेली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मीरा - भाईंदर (जि.ठाणे) येथे १६५ जणांना मलेरिया तर**
**१५ जणांना डेंग्युचा प्रादुर्भाव झाल्याबाबत**

**(९५) * ६०९८ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अवधुत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मीरा - भाईंदर येथे १६५ जणांना मलेरिया तर १५ जणांना डेंग्युचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे डिसेंबर २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, मलेरिया व डेंग्यु साथीला आळा घालणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात माहे डिसेंबर, २०१४ मध्ये हिवतापाचे ६ रुग्ण आढळून आले आहेत. तर जानेवारी, २०१४ ते डिसेंबर, २०१४ या वर्षभरात हिवतापाचे २२६ रुग्ण व डेंग्युचे २५ रुग्ण आढळून आले आहेत,

२) व ३) शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून डेंग्यू व

हिवताप प्रतिबंधाकरिता आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यामुळे शासनाकडून याबाबत स्वतंत्र चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.
४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागोठणे (जि.रायगड ) येथील शांती नगर परिसरात एकाच रात्रीत दहा ठिकाणी घरफोडयाचे प्रकार झाल्याबाबत**

**(९६) * ७९७० श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागोठणे (जि.रायगड ) येथील शांती नगर परिसरात एकाच रात्रीत दहा ठिकाणी घरफोडया करून अज्ञात चोरटयांनी लाखो रूपयांचा ऐवज लंपास केल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३)चौकशीत काय आढळून आले, तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १३.०१.२०१५ ते १४.०१.२०१५ रोजी मौजे नागोठाणे शहरातील शांतीनगर परिसरात ११ दुकान /घर /ऑफिस यांचेकडी कोयंडे तोडुन, शटर उचकुन घरफोडी चोरी करुन गुन्ह्यात चोरट्यांनी एकुण ३६,८५०/- रुपयांचा माल व रोख रक्कम रुपये २९,१५०/- असा घरफोडी करुन चोरुन नेला आहे.
(२) व (३) होय. सदरबाबत नागोठणे पोलीस ठाण्याकडे कॉ.गु.र.नं. ०३/ २०१५ भादंविसं कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
सदर गुन्ह्यात एकुण १२ साक्षीदार यांचेकडे चौकशी करण्यात आली असून श्वान पथक, अंगुलीमुद्रा तज्ञ यांना घटनास्थळी पाचारण करुन त्यांचा अभिप्राय घेण्यात आला आहे.
पोलीस ठाणे रेकॉर्डवरील गुन्हेगार, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील सजेशन मधील पुर्व गुन्हेगार यांना चेक करुन त्यांचेकडे तपास करण्यात आलेला आहे. आता पर्यंत उपयुक्त माहिती मिळुन आली नाही. सदर गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.